दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -२५२ गुरुवार,दि.१५ मे २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-252 | Thursday, Dt.15 May 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# बीडमध्ये इर्टिगा गाडी पलटली होऊन दोघे ठार, तर कराडजवळ टेम्पोच्या धडकेत दुचाकीवरील दोन तरुणी जागीच संपल्या

**बीड : अंबाजोगाई-आडस रस्त्यावरील उमराई पाटीजवळ बुधवारी दुपारी एक भीषण अपघात घडला. दुचाकीस्वाराला वाचवण्याच्या प्रयत्नात इर्टिगा कार पलटून झालेल्या या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला. तर चार जण गंभीर जखमी झाले आहेत.**

**माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथील एक कुटुंब विवाहासाठी इर्टिगा कारमधून (एमएच ०५ सीव्ही ९१८६) अंबाजोगाई येथे येत होते. यावेळी उमराई पाटी परिसरातील दत्त मंदिरासमोर एक दुचाकीस्वार अचानक कारसमोर आला. याच दुचाकीस्वाराला वाचवण्याचा प्रयत्नात चालकाचा कारवरील ताबा सुटल्याने कार रस्त्याच्या कडेला जाऊन पलटली.**

या अपघातात शौकत अहमद शेख (वय ४६) आणि खय्युम अब्बास अत्तार (वय ४५) या दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर इतर चार जण गंभीर जखमी असून त्यांना उपचारासाठी स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर कराडजवळील आटके गावच्या हद्दीत आयशर टेम्पो आणि दुचाकीच्या अपघातात दुचाकीवर असणाऱ्या दोन तरुणी जागीच ठार झाल्याची घटना घडली. करिष्मा कळसे, पूजा कुऱ्हाडे असं अपघातात ठार झालेल्या तरुणींची नावे आहेत. या अपघातानंतर लोकांनी आयशर टेम्पोवर दगडफेक केली.

नांदुराजवळ मंगळवारी पहाटे अपघात

बुलढाण्यातील नांदुरा शहरात मंगळवारी पहाटे एक भीषण अपघात झाल्याची घटना घडली. या अपघातामध्ये तिघांचा जागीच मृत्यू झाला असून चार जण जखमी आहेत. प्राथमिक माहितीनुसार, बुलढाण्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर हा अपघात घडला. पहाटे साडेचार वाजता नांदुरा शहराजवळ आर्टिगा कार आणि ट्रकची जोरदार टक्कर झाली. ही टक्कर इतकी जोरदार होती की, कारमधील तिघांचा जागीच मृत्यू झाला.

चंद्रपुरातही अपघात, तिघांचा मृत्यू

चंद्रपूर शहरातून प्रवासी वाहतूक करणाऱ्या काळी पिवळी टाटा मॅजिक वाहनाला ट्रकची धडक बसल्याने भीषण अपघाताची घटना घडली. या







## बुधवार ठरला अपघातवार




अपघातात टाटा मॅजिकच्या ड्रायव्हरसह ३ जणांचा मृत्यू झाला असून १४ प्रवासी जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती कळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत चंद्रपूर (उहरपवीरीीि) प्रशासन व स्थानिकांच्या मदतीने बचावकार्य सुरू केले.

अपघातातील जखमींना जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आल्याची माहिती देण्यात आली. या अपघातात निर्दोष मोहूर्ले (ड्रायव्हर), मनाबाई सिडाम (६५) आणि एक प्रवासी असे एकूण तिघे मृत्यू झाल्याची घटना घडली.

# ग्रामविकास विभागाचे उप आयुक्त झाले 'अप्पर आयुक्त'

**प्रतिनिधी @ बीड**

महाराष्ट्र राज्य विकास सेवा गट अ संवर्गातील उपायुक्त आस्थापना व उपायुक्त विकास यांच्या पदनामांमध्ये बदल करणे बाबत महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेच्या वतीने शासनाकडे वारंवार विनंती केली होती. सदर मागणी ही संघटनेच्या वतीने अनेक वर्षापासून करण्यात येत होती. ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांच्याकडे वारंवार बैठका देखील संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या होत्या. अखेर ग्रामविकास व पंचायत राजमंत्री ना. जयकुमार गोरे यांच्या मान्यतेने ग्रामविकास विभागाचे उप आयुक्त हे अप्पर आयुक्त झाले.

त्या अनुषंगाने दि. १३ मे २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासनाने महाराष्ट्र विकास सेवा गट-अ संवर्गातील उप आयुक्त (आस्थापना) व उप आयुक्त (विकास) यांच्या पदनामांमध्ये अप्पर आयुक्त (आस्थापना) व अप्पर



ग्रामविकास मंत्री ना. जयप्रकाश गोरे यांचा मोठा निर्णय

आयुक्त (विकास) असा बदल केलेला आहे. पदनामातील बदलामुळे महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेतील अधिकारी यांचे कडून समाधान व्यक्त करण्यात आले आहे. राज्याच्या ग्रामविकास कार्यात अधिक गतीमानता आणण्याचा तसेच शासनाच्या योजनेचा लाभ तळागाळातील नागरीकापर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी अधिक सक्षमपणे काम करतील.

सदर निर्णयासाठी मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री ना.अजित पवार, ग्राम विकास व पंचायत राज मंत्री ना. जयकुमार गोरे, राज्यमंत्री ना. योगेश कदम यांच्यासह प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी संघटनेच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देऊन अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली मागणी पूर्ण केली आहे. महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेच्या वतीने या सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले आहेत. सदर निर्णय व्हावा यासाठी महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित संघटनेचे अध्यक्ष सुरेश बेदमुथा सरचिटणीस वासुदेव सोळंके यांच्यासह सर्व संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.

# 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशानंतर भारतीय सेनेच्या सन्मानार्थ भव्य तिरंगा यात्रा



## मुंबईत मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्र्यांसमवेत ना. पंकजाताई मुंडेंचा सहभाग

मुंबई।प्रतिनिधी

भारतीय सेनेने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे दाखविलेल्या शौर्य, संयम आणि बलिदानाच्या सन्मानार्थ भव्य तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली. या यात्रेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे सहभागी झाल्या होत्या. याप्रसंगी देशसेवा केलेल्या सैन्यदलातील सेवानिवृत्त अधिकारी आणि जवानांची लक्षणीय उपस्थिती होती.

ऑगस्ट क्रांती मैदान ते गिरगाव चौपाटीपर्यंत काढलेल्या या तिरंगा यात्रेला मुंबईकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ऑगस्ट क्रांती मैदानातील स्तंभाला अभिवादन करुन तिरंगा यात्रेला सुरुवात झाली आणि गिरगाव चौपाटी येथील हुतात्मा तुकाराम ओंबाळे यांच्या पुतळ्याला पुष्पचक्र अर्पण करत अभिवादन करुन या यात्रेचा समारोप झाला. या तिरंगा यात्रेत भाजपाचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण, मंत्री आशिषजी शेलार, मंगलप्रभात लोढा तसेच भाजपाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बीड - धर्मवीर,स्वराज्य रक्षक,छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त खा.बजरंग सोनवणे,आ.सदीप क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी अभिवादन केले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शंभूप्रमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# न्यायमूर्ति भूषण रामकृष्ण गवई यांनी भारताच्या ५२व्या सरन्यायाधीश पदाची घेतली शपथ

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिली शपथ

**प्रतिनिधी @ नवी दिल्ली**

राष्ट्रपति भवनात आयोजित एका विशेष समारोहात न्यायमूर्ति भूषण रामकृष्ण गवई यांनी भारताच्या ५२व्या मुख्य न्यायाधीश म्हणून आज सकाळी शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.या समारोहाला पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपराष्ट्रपती जगदीप धनगड, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग,कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल, सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश संजीव खन्ना, सर्वोच्च न्यायालयाचे इतर न्यायाधीश, वरिष्ठ सरकारी अधिकारी आणि कायदा क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. निवृत्त मुख्य न्यायाधीश संजीव खन्ना यांचा कार्यकाल १३ मे २०२५ रोजी संपल्यानंतर न्यायमूर्ति गवई यांनी हे पद त्यांच्याकडून स्वीकारले.

न्यायमूर्ति भूषण रामकृष्ण गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी महाराष्ट्रातील अमरावती येथे झाला. ते प्रसिद्ध राजकारणी, आंबेडकरवादी नेते, माजी खासदार आणि विविध राज्यांचे राज्यपाल राहिलेले रा.सु. गवई यांचे सुपुत्र आहेत. त्यांच्या कुटुंबाला डॉ. बी.आर. आंबेडकर यांच्या विचारांचा समृद्ध वारसा आहे आणि ते बौद्ध धर्माचे अनुयायी आहेत. न्यायमूर्ति गवई यांनी १९८५ मध्ये नागपूर विद्यापीठातून बी.ए. एल.एल.बी. पूर्ण करून आपल्या कायदेशीर कारकीर्दीला सुरुवात केली. १९८७ मध्ये त्यांनी बॉम्बे उच्च न्यायालयात स्वतंत्र वकिली सुरू केली, प्रामुख्याने नागपूर खंडपीठात. १९९२-९३ मध्ये त्यांनी सहाय्यक सरकारी वकील आणि अतिरिक्त लोक अभियोजक म्हणून कार्य केले. २००३ मध्ये त्यांची बॉम्बे उच्च न्यायालयात अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली आणि २००५ पासून ते कायमस्वरूपी न्यायाधीश झाले. २४ मे २०१९ रोजी त्यांना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून



पदोन्नती मिळाली.

न्यायमूर्ति गवई यांची सरन्यायाधीशपदासाठी नियुक्ती सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठेतेनुसार झाली आहे, सरन्यायाधीस संजीव खन्ना यांच्यानंतर दुसरे सर्वात वरिष्ठ न्यायाधीश होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २९ एप्रिल २०२५ रोजी त्यांच्या नियुक्तीला मंजुरी दिली होती. न्यायमूर्ति गवई यांचा सरन्यायाधीश म्हणून कार्यकाल सुमारे सहा महिन्यांचा असेल. ते २३ नोव्हेंबर २०२५ रोजी वयाच्या ६५व्या वर्षी निवृत्त होतील.

सर्वोच्च न्यायालयात असताना, न्यायमूर्ति गवई यांनी अनेक ऐतिहासिक खटल्यांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. डिसेंबर २०२३ मध्ये, त्यांनी पाच न्यायाधीशांच्या खंडपीठात सहभाग घेऊन केंद्र सरकारच्या २०१९ च्या अनुच्छेद ३७० रद्द करण्याच्या निर्णयाला सर्वसंमतीने मान्यता दिली. २०१६ च्या विमुद्रीकरणाच्या निर्णयाला बरकरार ठेवणाऱ्या खंडपीठातही त्यांचा समावेश होता. राजकीय निधीसाठीच्या इलेक्टोरल बाँड योजनेला असंवैधानिक ठरवणाऱ्या खंडपीठाचा ते भाग होते. २०२४ मध्ये, अवैध बांधकामांविरुद्ध बुलडोजर कारवाईवर देशव्यापी मार्गदर्शक तत्त्वे जारी करणाऱ्या खंडपीठात त्यांनी अमूल्य योगदान दिले आहे. पंजाब राज्य बनाम दविंदर सिंग (२०२४) खटल्यात, त्यांनी डउ/डढ साठी क्रीमी लेयर सिद्धांत लागू करण्याची वकिली केली, ज्यामुळे वास्तविक समानता सुनिश्चित होईल. न्यायमूर्ति गवई यांनी ७०० हून अधिक खंडपीठांमध्ये सहभाग घेतला आहे आणि सुमारे ३०० निर्णयांचे लेखन केले आहे. ज्यामध्ये संवैधानिक, प्रशासकीय, नागरी, फौजदारी आणि पर्यावरणीय कायद्यांचा समावेश आहे.

# जंगम समाजातील युवकांनी मुखेड येथील रुद्र शिबिरात सहभागी व्हावे

## ष.ब्र.प.१०८ श्री विरूपाक्ष शिवाचार्य महाराज

**प्रतिनिधी @ मुक्रमाबाद**

श्री गणाचार्य प्रतिष्ठान व श्री वीरमाहेश्वर जंगम समाज, मुखेडच्या वतीने गणाचार्य मठ संस्थान मुखेड येथे दि. १५ मे ते १४ जूनदरम्यान जंगम समाजातील १२ ते २५ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी मासिक श्री रूद्र शिबिर आयोजित करण्यात आले आहे. गणाचार्य मठ संस्थान येथे सामाजिक बांधिलकीतून अनेक उपक्रम राबविले जातात. व्याख्यानमाला, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, सामूहिक विवाह सोहळा, सार्वजनिक वाचनालय, रक्तदान शिबिर, योग शिबिरासह धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम राबविले जातात. यातून सामजिक प्रबोधन करण्यात येते. भजन, कीर्तन, प्रवचन प्रवचन, शिवनाम

सप्ताह ही होतात. जंगम समाजातील विद्यार्थ्यांवर सुसंस्कार व्हावेत, धार्मिक विधी शास्त्रोक्त पध्दतीची माहिती व्हावी म्हणून गत ११ वर्षांपासूनचे परंपरा महाराजांनी कायम ठेवली आहे . रुद्र शिबिरात दररोज सकाळी आर्ट ऑफ लिव्हिंगतर्फे ५ दिवसाचे योग शिबिर. अनुभवी शास्त्री गणांचे मार्गदर्शन, राहण्याचा व जेवण्याचा उत्तम मोफत व्यवस्था, श्रीरुद्र, पुजाविधी व पंचांग शिकवले जाणार आहे. यात श्री ष.ब्र.प. १०८ डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेड यांचे मार्गदर्शन राहील.दि.१५ मे २०२५ रोज गुरुवारी ठीक ११.०० वा.गणाचार्य मठ संस्थान मुखेड येथे भव्य उदघाटन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. श्री ष.ब्र.१०८ डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज, मुखेड श्री ष.ब्र. १०८ सिध्दलिंग शिवाचार्य महाराज, देवणी मा.आ.श्री प्रवीण स्वामी, उमरगा श्री श्रावण जंगम (रा. जंगम समाज संघटना, प्रमुख) श्री त्र्यंबक पट्वेकर (भोकर) व समस्त जंगम समाज संघटना पदाधिकारी, नांदेड मासिक प्रशिक्षणासाठी वेदमुर्ती शास्त्रीगन श्री विश्वनाथ मठपती (श्रीशैलम) श्री विवेकानंद स्वामी (लातूर), श्री शुभम स्वामी (फुलवळ) श्री साईनाथ मठपती (पाचपिपळीकर) श्री शुभम स्वामी (जळकोटकर) या शिबिरास विशेष उपस्थिती राहणार आहे तरी पंचक्रोशीतील जंगम समाजातील विद्यार्थ्यांनी ज्ञानाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन श्री.ष.ब्र.प.१०८. डॉ. पीरुपाक्ष शिवाचार्य महाराज यांनी केले आहे.शिबीरासाठी श्री नागनाथ स्वामी, मुखेडकर यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन मठ संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.



शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

संपादकीय

## शस्त्रसंधी म्हणजे युध्दविराम नव्हे...

ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारताने पाकिस्तानातील दहशतवाद्यांची ९ ठिकाणे उद्ध्वस्त केली. यापुढेही भारत कारवाई करण्यासाठी मागेपुढे पाहणार नाही असा इशारा पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. देशवासीयांना संबोधित करताना ते एवढे बोलून थांबले नाही, तर यापुढे दहशतवाद आणि व्यापार एकाचवेळी चालणार नाही, पाणी आणि रक्त एकत्र वाहणार नाही. त्यामुळे पाकिस्तानसोबत चर्चा झाली, तर फक्त पाकव्याप्त काश्मीरवर आणि दहशतवादावरच होणार असल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले. दोन्ही देशांच्या समन्वयाने शस्त्रसंधी झाल्याने भारताकडून ऑपरेशन सिंदूर तूर्त स्थगित करण्यात आले असले तरी, पाकिस्तानकडून कुरघोडी झाल्या, तर ते पुन्हा सुरू करण्यात येईल, असे पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट करून, पाकिस्तानला एकप्रकारे इशारा दिला आहे.

पहलगाम हल्ल्यात २६ निरपराधांचा बळी गेला. त्यामुळे भारताने शंभरहून पाकिस्तानी दहशतवाद्यांचा खात्मा केला. तसेच, पाकिस्तानचे ४०० हून अधिक ड्रोन हल्ले भारताने परतवले. भारतीय सैन्याकडून तीन दिवसांत केलेल्या कारवाईमुळे पाकिस्तानची भंबेरी उडाली होती. भारताने असे हल्ले सुरू ठेवले, तर पाकिस्तान हा देश जगाच्या नकाशांवर राहील का अशी भीती पाकिस्तानी जनतेच्या मनात निर्माण झाली होती. या भयातून पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी अमेरिका, चीनसह जगातील अन्य देशांकडे मदतीचा हात मागितला. चीन आणि तुर्कीस्तान वगळता कोणीही पाकिस्तानला पाठिंबा दिला नव्हता. मात्र जगात युद्ध नको म्हणून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तानने शस्त्रसंधी करावी असा प्रस्ताव पुढे आणला. या प्रस्तावाला भारताने सहमती दर्शवली, याचा अर्थ अमेरिकेपुढे लोटांगण घातले असा प्रचार काही मोदी द्रेष्ट्यांनी सुरू केला; परंतु त्यात काही तथ्य नव्हते. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून दहशतवाद्यांची पाळेमुळे खणून, त्याचे कंबरडे मोडणे हा भारताचा मुख्य हेतू होता. पाकिस्तानातील सर्वसामान्य नागरिकांना धोका पोहोचेल अशी कोणतीही कृती भारतीय लष्कराने केली नव्हती. त्यामुळे, शस्त्रसंधीचा पर्याय पाकिस्तानातील डीजीएमओमधील अधिकाऱ्यांमार्फत आल्यानंतर, आपल्या लष्कराने शांततेचा मार्ग स्वीकारण्याचा घेतलेला निर्णय हा योग्य होता.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने ऑपरेशन सिंदूरची कारवाई करण्यासाठी लष्कराला पूर्णपणे मुभा दिली होती. त्यामुळे, लष्कर अलर्ट मोडवर असतानाही शस्त्रसंधीचा पर्याय स्वीकारण्याचा निर्णय हा एक युद्धनीतीचा भाग होता. मात्र मोदींवर टीका करण्याची संधी कधी मिळेल याकडे डोळे लावून बसलेल्या काँग्रेस आणि विरोधी पक्षाच्या नेत्यांकडून मात्र शस्त्रसंधी का केली, असा सवाल आता विचारायला सुरुवात केली आहे. या विरोधकांना आता देशप्रेमापेक्षा मोदी कधी अडचणीत सापडतील, याची संधी हवी आहे असे दिसते. म्हणूनच त्यांना आता शस्त्रसंधी का केली या विषयावर संसदेचे विशेष अधिवेशन हवे आहे. विरोधकांच्या कोल्हेकुईकडे दुर्लक्ष करत, मोदी यांनी थेट देशवासीयांशी संवाद साधून सगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा सोमवारी रात्री आठ वाजता प्रयत्न केला आहे.

भारतीय सैन्याने पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे अड्डे अचूकरीत्या उद्ध्वस्त केले. दहशतवाद्यांनी कल्पनाही केली नव्हती की भारत इतका मोठा निर्णय घेऊ शकेल. जेव्हा राष्ट्र सर्वोच्च असते तेव्हा असे कठोर निर्णय घेतले जातात.ज्यांनी आमच्या बहिणींचे कुंकू पुसले त्याचा बदला भारताने घेतला. ऑपरेशन सिंदूरच्या यशासाठी मी संरक्षण दलांना सलाम करतो. भारतावर जर यापुढे दहशतवादी हल्ला झाला, तर जशास तसं उत्तर दिलं जाणार हे ऑपरेशन सिंदूरमुळे स्पष्ट झालं. आपण सर्वांनी भारताचा संयम व क्षमता या दोन्ही गोष्टी पाहिल्या आहेत. पाकिस्तानचे न्यूक्लिअर ब्लॅकमेल सहन करणार नाही. त्या धमकीच्या आडून दहशतवाद्यांना पोसणाऱ्यांना सोडणार नाही, असा इशारा पंतप्रधान मोदी यांनी पाकिस्तानला दिला आहे.

# छत्रपती संभाजीराजेंच्या स्मारकासह महापुरुषांचे पुतळे उभारण्याबाबत अनास्था

**३ वर्षांपूर्वी भुमिपुजन करूनही जिल्हा परिषदेतील काम रखडले; छत्रपती संभाजीराजे जयंतीदिनी धरणे आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे**

प्रतिनिधी @ बीड

जिल्हा परिषदेच्या आवारात छत्रपती संभाजी महाराजांसह विविध महापुरुषांचे पुतळे उभारणीबाबत १५ वर्षांपूर्वी जिल्हा परिषदेचा ठराव झाला. यासाठी आंदोलने आणि उपोषणेही झाली. नवीन इमारतीच्या आवारात छत्रपती संभाजीराजांचे स्मारक आणि इतर राष्ट्रपुरुषांचे पुतळे उभारण्याची घोषणा जिल्हा परिषदेच्या तत्कालीन पदाधिकाऱ्यांनी केली. विशेष म्हणजे तत्कालीन पालकमंत्री व ग्रामविकास मंत्र्यांनी १९ मार्च २०२२ रोजी पुतळे उभारणीच्या कामाचे भूमिपूजन झाले. परंतु तीन वर्षापासून अद्याप कामाला सुरुवातच झाली नाही. ३ वर्षांपूर्वी भुमिपुजन करून मागणी करणारे आणि घोषणा करणारे सत्तेत असुन तातडीने स्मारकांचे काम पूर्ण करण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी आज दि.१४ मे बुधवार छत्रपती संभाजीराजे जयंतीदिनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदेच्या आवारात धरणे आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, कार्यकारी अभियंता बां.वि.क्र.१ जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले यावेळी आंदोलनात विभागीय अध्यक्ष संभाजी ब्रिगेड राहुल वायकर,,मराठासेवक संजय गोडसे, बीड जिल्हाध्यक्ष राष्ट्रीय छावा संघटना युवराज मस्के, बीड जिल्हाध्यक्ष बुलंद छावा संघटना विठ्ठल बहिर, मराठा सेवक अशोक सुरवसे, राहुल कवठेकर, शेख मुबीन, रामनाथ खोड, पांडुरंग हराळे, रामकिसन कदम, किशोर निर्मळ,अंगद मांडवे,शाकींदर काटकर, मुरलीधर काटकर आदी सहभागी होते. कार्यकारी अभियंता बां.वि.क्र.१ जि.प.बीड मोमीन सय्यद शकील सय्यद यांनी आंदोलनस्थळी चर्चा करून सदरील महापुरूषांचे पुतळे बांधण्याकरीता चालु आर्थिक वर्ष २०२५-२६ जिल्हा परिषद उत्पन्नातुन तरतूद ५० लक्ष रुपये इतकी करण्यात आली असुन सदरील ईमारतीचे संरक्षण भिंत बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे लेखी आश्वासन दिले.

जिल्हा परिषदेच्या आवारात छत्रपती संभाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा तसेच छत्रपती राजश्री शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले ,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचे अर्धाकृती पुतळे उभारण्याचा ठराव जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत २०१० साली झाला. त्यानंतर पुढे काहीच हालचाल झाली नाही पुढे दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे ,दिवंगत लोकनेते सुंदरराव सोळुंके ,दिवंगत लोकनेत्या केशरकाकु क्षीरसागर यांच्या पुतळ्यांच्या उभारण्याची मागणी पुढे आली. त्यानंतर जिल्हा परिषदेचे नवीन प्रशासकीय इमारत उभारणीचे काम सुरू झाले.नवीन प्रशासकीय इमारतीसमोर पुतळे उभारणीसाठी छत्रपती शंभू प्रेमींनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले होते. त्यावेळी तत्कालीन जिल्हा परिषद उपाध्यक्ष व विद्यमान खासदार बजरंग सोनवणे तत्कालीन सभापती जयसिंह सोळंके आदींनी नवीन इमारतीच्या आवारात पुतळे उभारण्याचे आश्वासने दिले होते.

महापुरुषांसह लोकनेत्यांच्या पुतळ्यांची मागणी करणारे आणि याबाबत घोषणा करणारे नेते आज एकत्र राज्याच्या सत्तेत आहेत. दि. १९ मार्च २०२२ रोजी तत्कालीन पालकमंत्री धनंजय मुंडे, मंत्री अब्दुल सत्तार, तत्कालीन उपाध्यक्ष बजरंग सोनवणे हे प्रत्यक्ष तर तत्कालीन ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्या ऑनलाइन उपस्थितीत जिल्हा परिषदेच्या नव्या इमारतीचे लोकार्पण आणि महापुरुषांच्या पुतळ्यांचे भुमिपूजनही पार पडले. तेव्हाही सत्तेत असलेले मंडळी आत्ताही सत्तेत आहेत. मात्र महापुरुषांच्या




पुतळ्या बाबत सरकारला अनास्था का ? असा सवाल डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपस्थित केला आहे.

जिल्हा परिषदेच्या नूतन प्रशासकीय इमारतीचे लोकार्पण करण्यापूर्वी अगोदर पुतळ्यांची उभारणी व नंतरच इमारतीत कारभार अशी भूमिका घेत शंभू प्रेमींनी आंदोलने केली होती. दि.१६ जानेवारी २०२३ रोजी डॉ.गणेश ढवळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मावळ्यांच्या वेशभूषेत लक्ष्यवेधी आंदोलन केल्यानंतर तत्कालीन सिईओ अजित पवार यांनी चबुत-यासाठी ५ लक्ष रुपये व फेब्रुवारी २०२३ अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली असुन संरक्षण भिंतीचे काम पूर्ण करून स्मारकांचे काम सुरू करण्यात येईल असे आश्वासन दिले होते.परंतु पुढे काहीच हालचाल नाही.आज आंदोलन स्थळी कार्यकारी अभियंता बां.वि.क्र.१ मोमीन सय्यद शकील अहमद यांनी जिल्हा परिषद बीड येथील नविन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता महाराष्ट्र शासन ग्रा.वि.वि.शासन निर्णय क्र.जिपई-२०२२/पत्र.क्र.१०/बां.-४ बांधकाम भवन मुंबई दि.२४.०२.२०२५ अन्वये अंदाजपत्रके रक्कम ३५,५७,५७,५२२ मंजुरी मिळाली असुन सदरील इमारतीचे संरक्षण भिंत बांधकामाकरिता लश्रर्रीश ३५ नुसार मा. अधीक्षक अभियंता सा .बां.मंडळ धाराशिव यांची मंजुरी घेऊन पुढील काम करण्यात येईल. व तसेच सदरील महापुरुषांचे पुतळे बांधण्याकरीता चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ जिल्हा परिषद उत्पन्नामधून तरतूद ५० लक्ष ईतकी करण्यात आलेली आहे. तरी सदर इमारतीचे संरक्षण भिंत बांधकामाचे काम पूर्ण झाल्यानंतर पुढे ती योग्य ती कारवाई करण्यात येईल असे लेखी दिले आहे. त्यामुळे एकंदरीतच पुतळे उभारण्याच्या फायलीचा प्रवास संथ असुन शासन आणि प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यापैकी कोणालाही सोयरेसुतक नसल्याचे दिसून येते.

## छत्रपती संभाजी विद्यालयाचे उज्वल यशाची परंपरा कायम

# शाळेचे १००% निकाल

प्रतिनिधी @ मुक्रमाबाद

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील छत्रपती संभाजी विद्यालयाच्या उज्वल यशाची परंपरा कायम असून या वर्षी शाळेचा निकाल १००% टक्के लागला आहे. माध्यमिक शालांत परीक्षा बोर्डाचा २०२५ चा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. मुक्रमाबाद येथील छत्रपती संभाजी विद्यालयातील गुमडे पुलकित बालाजी ९४.८०% केंद्रातून सर्वप्रथम शेळके यश संजय ९२.८० कु.भूषणवाड अंजली संजय ९२.८०कु. उप्पे शिवानी प्रकाश ९२.२० कु . सोरटे महेश्वरी विठ्ठलराव ९१.६० कु सादगिरे अस्मिता बालाजी ९१.२० कु जाधव वैष्णवी गोविंदराव ९१.०० कु . शेख माजिया मुस्तफा ९०.८०कु.नाईक सरस्वती देवराव ९०.४० कू. धुळगुंडे हरिप्रिया एकनाथ ९०.८० कू.कांबळे क्रांती कामाजी ९०.०० कू. सोलापूरे कृर्तिका कृष्णा ९०.००शाळेचा एकूण निकाल १००% सेमी इंग्रजीचा निकाल १००% ७५विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण ४५विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण



०७ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण ९०% पेक्षा जास्त गुण मिळवलेले १२ विद्यार्थी एकूण १२७ विद्यार्थ्यांपैकी १२७ विद्यार्थी उत्तीर्ण सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन मा. व्यंकटराव पाटील गोजेगावकर साहेब व गजानन पाटील गोजेगावकर श्रीनिवास पाटील गोजेगावकर मुख्याध्यापक श्री भायेगावे सर, दुडीले सर खंकरे सर जाधव सर गुमडे सर कोठारे सर लोकलवार सर खरात सर देमगुंडे सर सौ खंकरे मॅडम सौ. कुडदुलवार मॅडम तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक व पत्रकार बांधव व गावकऱ्यांच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

# महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना संपर्क कार्यालयाचा शुभारंभ

प्रतिनिधी @ बीड

**कामगारांचे हक्क आणि त्यांच्या समस्यांवर उपाय काढू - अमरसिंह पंडित**

महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना बीड संपर्क कार्यालय शाहूनगर बीड येथे दिनांक १४ मे २०२५ रोजी उद्घाटन म्हणून राष्ट्रवादी पक्षाचे सरचिटणीस मा आमदार अमरसिंहजी पंडित यांच्या हस्ते संपन या वेळी राष्ट्रवादी चे नेते, शेख निजामभाई, फारुक पटेल, प्रा.गोपाळ धांडे. संघटनेचे प्रदेश अध्यक्ष नगरसेवक शेख अमर उपस्थित होते.

या उद्घाटन प्रसंगी मा आमदार अमरसिंहजी पंडित यांनी कामगारांना मार्गदर्शन करताना सांगितले. महाराष्ट्र बांधकाम कामगार संघटना सामाजिक न्याय आणि समानता स्थापित करण्यासाठी काम करताते जेणेकरून सर्व कामगारांना समान संधी आणि वागणूक मिळेल त्याच पद्धतीने काम करावे.सर्व पदाधिकारी यांनी संघटनेच्या माध्यमातून कामगारांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या कामाच्या अटी सुधारण्यासाठी एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. त्यांचे काम कौतुक करण्यासारखे आहे कारण ते कामगारांना अधिक चांगल्या वेतन, कामाच्या अटी आणि सुरक्षित कामाच्या वातावरणासाठी लढायला मदत करतात



येत्या काही दिवसात कामगारांचे रखडलेले समस्या बाबतीत लवकरच जिल्हा कामगार अधिकारी व कामगार संबधित कर्मचारी यांच्या समवेत जिल्ह्यातील सर्व कामगार संघटनेची बैठक लावण्यात येईल असे आश्वासन माजी आमदार अमरसिंहजी पंडित यांनी उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमात दिले.

## जाहिर प्रगटन

आमचे पक्षकार सौ. सुरेखा चंद्रकांतराव रत्नपारखी रा. सावरगांव ता. माजलगांव ह.मु. संभाजीनगर यांनी दिलेल्या माहीती, सुचना व अधिकारावरुन आम जनतेस सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकाराने सुनील सुभाष कुलकर्णी यांच्यासोबत रा. जिजामाता नगर, माजलगांव ता. माजलगांव जि.बीड यांच्या सोबत दि. ११/०६/२०२४ रोजी ईसारपावती / कारारपावती आधारे जमीनविक्रीचा करार केला होता परंतु त्या करारामधील अटींची शर्तीची त्यांनी पुर्तता केलेली नाही तसेच, खरेदीखत न करता व ठरलेली रक्कम मुदतीत न देता केवळ ईसारपावती आधारे तिराहीत लोकांना विक्री करण्याच्या तयारीत असुन त्यांनी दि. ०७/०३/२०२५ रोजी आमचे पक्षकारास त्यांच्या विधीज्ञांमार्फत नोटीस पाठविलेली आहे आणि त्यांच्या या नोटीसचे उत्तर आमचे पक्षकाराने दि. २८/०३/२०२५ कायदेशीर पद्धतीने त्यांना दिलेले आहे.

वास्तविक पाहता सदरच्या क्षेत्रावर आजही आमचे पक्षकाराची सौ. सुरेखा चंद्रकांतराव रत्नपारखी यांची मालकी व कब्जा आहे. ज्याचे क्षेत्रफळ १ हे ६२ आर असुन हे क्षेत्र शिवार मौजे सावरगांव ता. माजलगांव जि.बीड येथील असुन त्यांच्या चतु: सिमा पुढीलप्रमाणे आहेत

पुर्वेस - सरकारी रस्ता
पश्चिमेस - नाईकनवरे यांची जमीन
दक्षिणेस - स्वामी बाळाभाऊ यांची जमीन
उत्तरेस -नाईकनवरे यांची जमीन आहे.

या जमीनीवर आमचे पक्षकाराचा आणि त्यांच्या वारसांचा मालकी व अधिकार आजही कायम आहे.

आमचे पक्षकार आणि सुनील कुलकर्णी सोबत झालेला करार मुदतबाह्य झालेला असुन त्यांनी सुनील कुलकर्णीला कराराची पुर्तता करण्यास वेळोवेळी मुदत दिली होती. तरी ही सदर करार रद्द होण्यास ते सर्वस्वी जबाबदार आहेत

आमचे पक्षकारास मिळालेल्या माहितीनुसार सुनील कुलकर्णी ने केलेल्या तिऱ्हाईत व्यक्तीसोबतच्या व्यवहारास आमचे पक्षकार आणि त्यांचे वारस जबाबदार राहणार नाहीत आणि असे व्यवहार आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाहीत. सदर सुनील कुलकर्णी या व्यक्तीसोबत कोणीही या जमीनीबाबत कसलाही व्यवहार, करार करु नये याची नोंद सर्व जनतेने घ्यावी तसा कोणी प्रयत्न केल्यास त्यांचेविरुध्द माझे पक्षकार योग्य त्या स्वरुपाची फौजदारी / दिवाणी कार्यवाही करतील याचीही नोंद घ्यावी

करिता हे जाहिर प्रगटन

मार्फत
अ‍ॅड. आर. बी. गायकवाड
के.एस.के. कॉलेज रोड, बीड
मो. ९६३७७१९६८१
आरोही झेरॉक्स, बीड.

**अर्जदार**
**सुरेखा चंद्रकांतराव रत्नपारखी**
**रा. छत्रपती संभाजीनगर**
**मो. ८२६१८९८१८१**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. आर.आर. जाधव ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात**
**दिवाणी किरकोळ अर्ज क.४३३/२०२५**
**कस्तुरा व ईतर २ वि. निरंक**
**(मार्फत अ‍ॅड. बी. एम. मुळे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे जगन पि.शामराव सुरनर, रा. देवपिंपरी, ता. गेवराई, जि. बीड हे दिनांक १७/०३/२०२४ रोजी रा. मौजे देवपिंपरी, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले.

अर्जदार :- १) कस्तुरा भ्र. जगन सुरनर, वय ६९ वर्षे, धंदा घरकाम, रा. देवपिंपरी, ता. गेवराई, जि.बीड.

२) राधाकिसन पिता जगन सुरनर, वय ४९ वर्षे, धंदा शेती, रा. देवपिंपरी, ता. गेवराई, जि. बीड.

३) नामदेव पिता जगन्नाथ सुरनर, वय ४६ वर्षे, धंदा शेती, रा.देवपिंपरी, ता.गेवराई, जि. बीड.

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे जगन पि.शामराव सुरनर, रा. देवपिंपरी, ता. गेवराई, जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनाक ०७/०५/२०२५ माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख २५/०६/२०२५

**स्वाक्षरित**
**क.लिपीक**
**दिवाणी न्यायालय,**
**क.स्तर,गेवराई**

**आदेशावरून**
**स्वाक्षरित**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**क.स्तर,गेवराई**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. आर.आर. जाधव ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई गेवराई, जि. बीड यांचे न्यायालयात**
**दिवाणी किरकोळ अर्ज क.४२३/२०२५**
**सुभद्रा व ईतर २ वि. निरंक**
**(मार्फत अ‍ॅड.बी.एम. मुळे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे जालिंदर पि.रामभाऊ काळे, रा. आतकरे गल्ली, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड हे दिनांक २१/०८/२०२१ रोजी रा. आतकरे गल्ली, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले.

अर्जदार :- १) सुभद्रा भ्र. रामभाऊ काळे, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम,
रा. आतकरे गल्ली, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड.

२) मंगल भ्र.जालिंदर काळे, वय ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा. आतकरे गल्ली, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड.

३) गणेश पिता जालिंदर काळे, वय २० वर्षे, धंदा शिक्षण, रा. आतकरे गल्ली, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड.

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे जालिंदर पि.रामभाऊ काळे, रा. आतकरे गल्ली, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनाक ०७/०५/२०२५ माझया सही व शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख २५/०६/२०२५

**स्वाक्षरित**
**क.लिपीक**
**दिवाणी न्यायालय,**
**क.स्तर,गेवराई**

**आदेशावरून**
**स्वाक्षरित**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**क.स्तर,गेवराई**

# चिं .सार्थक नागापूरकर चे दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश



प्रतिनिधी @ बीड

बीड येथील नामांकित चंपावती विद्यालयात शिक्षण घेऊन इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत ९८. ६०% घेऊन चंपावती विद्यालयातून तिसरा क्रमांक पटकावला आहे सार्थक याने मेहनत चिकाटी शिक्षकांचे मार्गदर्शन आणि आई शैला गायकवाड यांच्या प्रयत्नांची जाणीव ठेवून हे नेत्र दीपक यश मिळवले आहे.त्याच्या या यशाबद्दल सर्व क्षेत्रातून भरभरून कौतुक अभिनंदन होत असून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे

याप्रसंगी बीड तहसील कार्यालयातील निवडणूक विभागचे नायब तहसीलदार सुरेंद्रजी डोके बीएलओ विभाग प्रमुख अनिल विद्यानगर महसूल सहाय्यक वसंत मंडलिक ऑपरेटर अमोल कणसे रोहित सोनवणे आई शैला गायकवाड मामा संतोष गायकवाड मित्र विकास काशीद व राधा काशीद आजी कमलबाई गायकवाड आदींनी सत्कार करून करिअरच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत .

# शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयाचा १०० टक्के निकाल

प्रतिनिधी @ बीड

येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयाचा शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. या विद्यालयाचे विद्यार्थी गाडे सुमित भागवत प्रथम, झीने कुंदन बाबासाहेब द्वितीय आणि घुले लहू अंगद तृतीय, या विद्यार्थ्यांसह पाच विद्यार्थ्यांनी विशेष गुणवत्ता यादीमध्ये यश संपादन केले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचे आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे अध्यक्ष बी.एस. धुतालमल, सचिव ॲड.व्ही.बी. मगर सर्व संचालक आणि मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांनी अभिनंदन केले असून शुभेच्छा दिल्या आहेत. या यशस्वी विद्यार्थ्यांचे या विद्यालयाचे शिक्षक विजय देशमुख, आर.बी. घुले, संतोष मेश्राम, श्रीमती एन.जी. मुंडे, डब्ल्यू.एस. वाघमारे, यु.बी. पवळ, आनंद छात्रालयाचे अधीक्षक डी.व्ही. खरसाडे, समर्थ गुरुकुलचे अधीक्षक रविराज घुले, शिक्षकेतर कर्मचारी एल.बी. हजारे, सुभाष गायकवाड, भारत कोळेकर पालक ,नागरिक यांनी अभिनंदन केले असून शुभेच्छा दिल्या आहेत.

# शालांत प्रमाणपत्र परीक्षेत कुलस्वामिनी भंडारे ९३.६०% गुण घेऊन उत्तीर्ण

प्रतिनिधी @ माजलगांव

नुकताच माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थीनी कु. कुलस्वामिनी शिवशंकर भंडारे हिने ५०० पैकी ४६५ गुण घेऊन म्हणजेच ९३.६०% गुण घेऊन उत्तीर्ण झाली आहे.



या मिळवलेल्या यशाबद्दल कु कुलस्वामिनी भंडारे हिचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, कार्यवाह अड विश्वास जोशी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, उपमुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे सर, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे सर, सदाशिव ढगे सर, कमलाकर झोडगे सर, परमेश्वर आदमाने सर, दहावी प्रमुख नरेंद्र कोष्टगावकर, राहुल नाईक, कार्यालय प्रमुख संतोष लवडकर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पिंपळनेरचा निकाल ९३ टक्के

प्रतिनिधी @ बीड

पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पिंपळनेर या शाळेने यशाची परंपरा कायम राखत याही वर्षी या शाळेचा निकाल ९३% टक्के लागला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.याबाबत अधिक माहिती अशी की,ज्ञ पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पिंपळनेर ता. जि. बीड या शाळेची यशस्वी निकालाची परंपरा कायम राखत या यू निकालात मुलींनीच बाज़ी मारली आहे .इयत्ता दहावी परिक्षेचा २०२४-२५ चा निकाल ९३% लागला आहे.विशेष प्राविण्यासह:-६८ विद्यार्थी व प्रथम श्रेणी मध्ये:-४७, द्वितीय श्रेणी मध्ये १६ विद्यार्थी, तृतीय श्रेणी मध्ये ०२ विद्यार्थी पास झाले आहेत.परीक्षेला एकुन १४० विद्यार्थी बसले होते.गुणानुक्रमे १)कु. डोईफोडे वैष्णवी:-९१.२०% गुण घेवुन प्रथम क्रमांक मिळवला आहे तर २) द्वितीय क्रमांकावर शेख शानम हिने:-९०.२०% गुण मिळविले आहेत ३) तृतीय क्रमांक कु. सपकाळ विद्या हिने:-९०% गुण घेतले आहेत.

या यशा बद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री साळवे सुहास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गोरख नाना कांडेकर, पिंपळनेरचे सरपंच मनोज काका पाटील,शाळेचे माजी अध्यक्ष शेख रसूल भैया यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.व शिक्षक ,शिक्षकेत्तर कर्मचार्यांचे कौतुक केले आहे.तसेच जेष्ठ शिक्षक निळकंठ, ससाणे,जामकर, पांचाळ, आंधळे,कदम, जाधव श्रीमती दुलेवाड,निर्मळ, सुपेकर व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



चौसाळा - येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त अभिवादन करताना सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर, संस्थापक अध्यक्ष प्रदीप (भाऊ) जोगदंड, सार्वजनिक जयंती अध्यक्ष समर्थ शिंदे, सचिव आदित्य हावळे, अक्षय नाईकवाडे सह आदी.



माजलगाव:- छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त येथील सह दुय्यम निबंधक कार्यालयात अभिवादन करताना सह दुय्यम निबंधक बि.डी.दारेवार,वरीष्ठ लिपिक गणेश चौधरी,पत्रकार रविन्द्र राऊत,प्रभाकर कांबळे, शिवसेनेचे शहरप्रमुख विक्रम शिंदे,भारत कसबे,फिरोज पठाण,व इतर

# बीड जिल्ह्याचा विकास करायचा नसेल तर यापुढे आमच्या दारात मते मागायला येवू नका - रुपाली देशपांडे

प्रतिनिधी @ बीड

बीडचा विकास तर सोडा पण मूलभूत गोष्टी मिळायला बोबाबोंब इथं आहे. बाकी अपेक्षा तर खूप लांब राहिल्या. बीड मध्ये भ्रष्टाचार एक नंबर ला, गुन्हेगारी साठी अव्वल नंबर ला मागील काही वर्षात तर सर्वात जास्त प्रमाणात गुन्हेगारीची वाढ झाली आहे. याला अनेक कारणापैकी राजकारण हे एक कारण प्रमुख आहे.

बीड येथील राजकारण वाढत्या गुन्हेगारीला प्रमुख आहे, गुन्हेगारांना पाठीशी घालायचं काम येथील राजकारण करत आहे. भ्रष्टाचार तर इथे जागोजागी भरला आहे.कोण कशात आणि कशाचे भ्रष्टाचारात हात अडकले आहेत हे ज्या त्या नेते मंडळीला माहित. महिला अत्याचार तर अश्यात इतका फोफवला कि बस. बीड हे महाराष्ट्रच्या नकाशात कायम लक्षात राहील. विनयभंग असो, कि बलात्कार असो किंव्हा मुलगी जन्म घेण्याच्या आधीच मारून टाकणे. सर्व ते गुन्हे अधिकच वाढत आहे पण कमी होण्यास तयार नाही. घरातील महिलेला तर सासरच्यांची मारणे, जाळणे, पैश्यासाठी त्रास देणे हे गुन्हे तर कॉमन झाले आहेत. बीड जिल्हा वाईट मार्गात पुढे नाही असे नाहीच सर्व तोपरी गुन्हे या जिल्ह्यात आहेत.

बीड जिल्यात सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या करतात तर



बीड जिल्हा हा खुणानांनी हादरून सोडणारा जिल्हा म्हणून ओळख आहे. जिल्यात सगळीकडे हाहाकार माजला मग अश्या वेळेस कोठे गेले हे राजकारणी ? बीड जिल्ह्यात तर कायदे नावाची गोष्ट कार्यरत आहे कि सर्व कायदे धाब्यावर बसविलेत कळत नाही.कायदा आणि सुव्यवस्था मोडकंळीस येऊन पडली आहे. राजकीय हस्तक्षेपामुळे कायद्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नाही.गुन्हेगारी आणि राजकारणाचे संबंध राजकीय अस्थिरता वाढवतात. जिल्ह्यात या प्रकारमुळे गुन्हेगारी वाढली आहे.बीड जिल्ह्यात गुन्हेगारीचे प्रमाण कमी करायचे असेल, अत्याचारचे प्रमाण कमी करायचे असेल तर एकच मार्ग आहे दारात कोणी हि मत मागायला आले तर त्याचे मागील बँकग्राउंड पहा तो आता पर्यत गुन्हेगारिशी संबधित आहे का आणि मगच त्याला मतदान करा.संपर्क - ८८८८९५५५३९

# अभिषेक दुधाळचे दहावीच्या परीक्षेत यश

प्रतिनिधी @ बीड

येथील वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय दुधाळ यांचा मुलगा चि.अभिषेक दुधाळ या विद्यार्थ्याने शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९५.६०% गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी, मार्चमध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी चि.दुधाळ अभिषेक दत्तात्रय या विद्यार्थ्याला मराठी विषयात ८९, हिंदी ९३ इंग्रजी ९१, गणित ९६, विज्ञान ९८ तर सामाजिक शास्त्रात



१०० पैकी १०० गुण मिळवून एकूण ५०० पैकी ४७८ गुण मिळवून घवघवीत यश मिळविले आहे. त्याने मिळविलेल्या यशाबद्दल सर्वत्र कौतूक होत आहे.

# स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी

## छत्रपती संभाजीराजे उद्यानात वृक्षारोपण

प्रतिनिधी @ लातुर

छत्रपती संभाजीराजे उद्यान मित्र मंडळाद्वारे छत्रपती संभाजीराजे उद्यान परिसर, विशाल नगर येथे स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजाऊ ब्रिगेडच्या राष्ट्रीय महासचिव श्रीमती वनिताताई काळे होत्या तर वीर भगतसिंग विद्यार्थी परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवश्री संभाजीराव नवघरे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी माजी नगरसेविका शिवमती रागिनीताई यादव, माजी नगरसेवक शिवश्री बालाजी मुस्कावाड, शिवश्री डॉ. बालाजी साळुंखे यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती.

प्रारंभी प्रमुख मान्यवरांनी छत्रपती संभाजी महाराजांचा प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. शिवश्री डॉ. दिनेश भिसे यांनी संभाजी महाराजांनी




लिहिलेल्या बुधभूषण ग्रंथाचा परिचय करून दिला. जयंतीचे औचित्य साधून छत्रपती संभाजीराजे उद्यानात वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी प्रा. डॉ. पांडुरंग शितोळे, विनोद चव्हाण, प्रा. डॉ. बालाजी भोसले, शिवमती रंजनाताई चव्हाण, शिवमती मीराताई देशमुख, शिवमती समाधानताई माने, शिवधर्म बचत गटाचे अध्यक्ष शिवश्री धनंजय उजणकर, शिवमती लता गंगणे, शिवमती पूजा कवे, शिवमती धनश्री कवे, शिवश्री बालाजी सूर्यवंशी, डॉ. भारती लाखे, इंजिनीयर गंडाळे, इंजिनीयर बरूरे, शिवश्री वैजनाथराव पाटील, शिंदे सर, बालाजी सर, संतोष देशमुख, मुख्याध्यापक भरत भोसले, शिवमती मीराताई देशमुख, लातूर वृक्ष टीमच्या अध्यक्षा सौ सुनंदाताई जगताप, आयोजन समितीचे पृथ्वीराज पवार, प्रवीण देशमुख, खंडेराव गंगणे कुलभूषण भदे, बालाजी मोरे, दशरथ देशमुख, बालाजी मुस्कवाड, बालासाहेब यादव, संजीव कुमार लांडगे, हिरा हेंडगे, रंदाळे सर आदींची देखील उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवश्री खंडेराव गंगणे यांनी केले. सूत्रसंचालन शिवश्री बालासाहेब यादव यांनी तर आभार प्रदर्शन शिवश्री पृथ्वीराज पवार यांनी केले.

# मराठवाडास्तरीय शास्त्रीय गायन स्पर्धेमध्ये बीडचा देव मुळे प्रथम तर स्वराली साळुंके द्वितीय





प्रतिनिधी @ बीड

गेवराई येथील स्वरसिद्धी फाउंडेशनच्यावतीने आयोजित मराठवाडा स्तरीय शास्त्रीय गायन स्पर्धा (छोटा ख्याल) यामध्ये बीडच्या देव दीपक मुळे याने प्रथम क्रमांक पटकावला, तर स्वराली नामदेव साळुंके हिने द्वितीय क्रमांक मिळवला. मराठवाड्यातील विविध भागांतील स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.

देव मुळे याने 'अमृतवर्षणी' रागामधील द्रुत एकताल बंदिश सादर करत श्रोत्यांची मने जिंकली. स्वराली साळुंके हिने 'राग दुर्गा' मधील तीनताल बंदिश सादर करत तिच्या गायकीने उपस्थितांचे मन जिंकले. स्पर्धेचे परीक्षण डॉ. तुळशीराम आतकरे व निशिगंधा डावरे (अहिल्यानगर) यांनी केले. गेवराईसारख्या लहान शहरात शास्त्रीय संगीताच्या प्रचारासाठी स्पर्धा घेणे आणि त्या माध्यमातून नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळवून देणे, ही अभिनंदनास्पद बाब आहे. या उपक्रमाबद्दल स्वरसिद्धी फाउंडेशनच्या अध्यक्षा कु. सिद्धेश्वरी कोकाटे व त्यांच्या सहकाऱ्यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे. देव व स्वराली यांच्या यशाबद्दल पं. गिरीश जोशी, प्राचार्य डॉ. सौ. दीपा क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, ज्येष्ठ पत्रकार महेश वाघमारे, सैनिकी विद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन पवार, शिक्षक मिलिंद शिवनीकर, ज्येष्ठ पत्रकार प्रशांत सुलाखे, रसिक फाउंडेशनचे अध्यक्ष अमरजी डागा, दीपक मुळे (देव कोचिंग क्लासेस), तबलावादक नरहरी धुळे, ह.भ.प. डाके महाराज, तसेच स्वरांग संगीत विद्यालयाचे संचालक व मार्गदर्शक नामदेव साळुंके

# पठाण माजेदखान फिरोजखान यांचे दहावी परीक्षेत यश

प्रतिनिधी @ पाटोदा

दहावीच्या परीक्षेत पठाण माजेदखान फिरोजखान ८८.६०% गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. कष्ट, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर मिळवलेले हे यश प्रेरणादायी आहे. त्यांच्या यशामुळे कुटुंबीयांसह मित्रपरिवारात आनंदाचे वातावरण आहे.पठाण माजेदखान फिरोजखान यांनी अभ्यासात दाखवलेली चिकाटी आणि मेहनत कौतुकास्पद आहे. शाळेच्या शिक्षक आणि पालकांच्या मार्गदर्शनासह त्यांनी हे यश मिळवले आहे. त्यांच्या यशाने शाळेचे नाव उज्वल केले असून,



इतर विद्यार्थ्यांसाठी ते प्रेरणेचे स्रोत ठरले आहेत. युवा नेतृत्व जुनेद भैय्या पठाण परिवारातर्फे पठाण माजेदखान फिरोजखान यांचे हार्दिक अभिनंदन व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा !

# सार्थक बहीरचे शालांत प्रमाणपत्र परीक्षेत यश

प्रतिनिधी @ बीड

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी, मार्च मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून प्रगती विद्यालयाचा विद्यार्थी चि.बहीर सार्थक सतीश या विद्यार्थ्याने ५०० पैकी ४७४ गुण मिळवून घवघवीत यश मिळविले आहे.

दहावीच्या परीक्षेत चि.सार्थक सतीश बहीर या विद्यार्थ्याने संस्कृत विषयात ९०, गणित ९४, सामाजिकशास्त्र ९५, विज्ञान ९७ तर इंग्रजी विषयात १०० पैकी ९८ गुण मिळवून या विषयात शाळेतून त्याला



सर्वाधिक गुण मिळाले, एकूण ९४.८०% गुण मिळविले. त्याने मिळविलेल्या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतूक होत आहे.

# आर्यन व अर्जुन थिगळे चे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश





प्रतिनिधी @ बीड

येथील संस्कार विद्यालयाचे विद्यार्थी आर्यन थिगळे, अर्जुन थिगळे या विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळविले आहे.संस्कार विद्यालय, बीड या शाळेचे विद्यार्थी थिगळे अर्जुन नितीन या विद्यार्थ्याने मराठी विषयात ९१, संस्कृत ९८, इंग्रजी ९४, गणित ८८, विज्ञान ८८, सामाजिकशास्त्रे ९६ असे एकूण ९५.८०% गुण मिळविले तर थिगळे आर्यन नितीन या विद्यार्थ्याने मराठी विषयात ९०, संस्कृत १००, इंग्रजी ८८, गणित ९६, विज्ञान ८८, सामाजिकशास्त्रे ९१ असे एकूण ९६% गुण मिळविले. या थिगळे बंधूंनी दहावीच्या परीक्षेत मिळविलेल्या घवघवीत यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतूक होत आहे.

# पत्रकार सत्तेच्या बाजूने नसतो तर तो सत्याच्या बाजूने असतो-डॉ.नागोराव कुंभार

प्रतिनिधी @ लातुर

समृध्द व्यापारच्या ११ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार सर तर उद्घाटक म्हणून डॉ.विठ्ठल लहाने हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डीवायएसपी गजानन भातलवंडे, सहाय्यक उपसंचालक डॉ.शाम टरके आणि प्र.जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप हे मान्यवर उपस्थितीत होते.

व्यासपीठावरून बोलताना डॉ.कुंभार म्हणाले, पत्रकार सत्तेच्या बाजूने नसतो सत्याच्या बाजूने असतो. लातूरची पत्रकारिता ही पॉझिटिव्ह आहे. डॉ.लहाने म्हणाले कोणत्याही यशासाठी सातत्य गरजेचे असते. डीवायएसपी भातलवंडे म्हणाले, मरेपर्यंत देशसेवा करणार तर डॉ.टरके म्हणाले डिजिटल पत्रकारिता करणे आवश्यक आहे. माहिती अधिकारी तानाजी घोलप यांच्यासह सर्व मान्यवरांनी समृध्द व्यापाराला शुभेच्छा दिल्या. वर्धापन दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील मान्यवरांना शाल, तुळशीचे रोप, समृध्द व्यापारचा राज्यस्तरीय दिवाळी विशेषांक, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते पुरस्कृत करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी का. संपादक निशांत परळकर, चंद्रकला परळकर, मोहिनी परळकर, गोरक्षनाथ मरळकर, शैलेश मरळकर,




श्लोक कुंभार, राघवेंद्र देबडवार, रविकिरण सूर्यवंशी, माधव तरगुडे, वीरभद्र तरगुडे, संतोष सोनवणे, विष्णू कळसे आदींनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समृध्द व्यापारचे संपादक दत्तात्रय जी. परळकर यांनी केले. सूत्रसंचालन सूरज मांदळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.दत्ता रामरुले यांनी केले.

पुरस्कार प्राप्त व्यक्ती

बाळासाहेब मोहिते-समृध्द अर्थ भूषण, संजय राजुळे-समृध्द आरोग्य भूषण, इस्माईल शेख-समृध्द मुख्याध्यापक भूषण, गंगाधर डिगोळे-समृध्द पत्रकार भूषण, स्वाती योगानंद जोशी समृध्द रणरागिणी भूषण, उषा आडे-समृध्द समाज भूषण

# दिव्यांग-अव्यंग विवाह प्रोत्साहन योजनेतून दोन जोडप्यांना अर्थसहाय्य

प्रतिनिधी @ लातुर

सामाजिक भेदभाव कमी करून समतोल आणि सलोखा निर्माण करण्याच्या उद्देशाने लातूर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत दिव्यांग-अव्यंग विवाह प्रोत्साहन योजनेअंतर्गत दोन जोडप्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचे धनादेश वितरित करण्यात आले. जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांच्या हस्ते बुधवारी हा धनादेश वितरण समारंभ पार पडला.

या योजनेअंतर्गत अहमदपूर तालुक्यातील हिप्परगा येथील सोमनाथ हरिकिशन नागरगोजे आणि कोमल लक्ष्मण केंद्रे, तसेच लातूर येथील विजय तुकाराम मोरे आणि पूजा पांडूरंग भोसले या जोडप्यांना लाभ मिळाला. २०२४-२५ या वर्षात २० जोडप्यांना एकूण १० लाख रुपयांचे अनुदान वितरित होणार आहे. प्रत्येक जोडप्याला २५ हजारांचा धनादेश आणि २५ हजारांचे बचत पत्र असे एकूण ५० हजार रुपये रक्कम दिली जाते.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूलकुमार मीना यांच्या मार्गदर्शनाखाली ही योजना राबवली जात आहे. धनादेश वितरण समारंभात समाज कल्याण निरीक्षक विक्रम जाधव, वरिष्ठ लिपिक वर्षा जोगदंड, कनिष्ठ लिपिक शिवराज गायकवाड, प्रशांत चामे, महेश पाळणे, रामनारायण भुतडा, ज्ञानेश्वर राव, प्रदिप संमुद्रे, श्रीकांत उंबरे आणि गणेश पाटील उपस्थित होते.

# प्रियदर्शनी मुंडेचे दहावी परिक्षेत यश



प्रतिनिधी @ बीड

बीड येथील मुळ रहिवाशी व पुणे येथील पीआयसीटी मॉडेल स्कुलची विद्यार्थीनी प्रियदर्शनी महादेव मुंडे हीने दहावी परिक्षेत ९८.८० टक्के गुण मिळवले आहेत. प्रियदर्शनी मुंडे विद्यालयातून तिसर्या क्रमांकावर आहे. तिच्या या यशाबद्दल शिक्षकवृंदांसह पालक, नातेवाईकांनी अभिनंदन केले आहे.



प्रतिनिधी @ बीड

म. शि. प्र मंडळ संचालित, यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीड येथे स्वराज्याचे दुसरे छत्रपती, स्वराज्य रक्षक, छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राजेच्या पावनस्मृतीस अभिवादन करण्यात आले.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूराव गहिनीनाथराव मरलापल्ले यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी महाविद्यालयामधील सर्व कर्मचारी, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ब्लॅकस्टोन समूहासोबत सामंजस्य करार

## महाराष्ट्रात ५,१२७ कोटींची थेट परकीय गुंतवणूक; २७,५१० रोजगाराच्या संधी

प्रतिनिधी @ मुंबई

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र शासन तसेच ब्लॅकस्टोन समूहाच्या एक्सएसआयओ लॉजिस्टिक्स पार्क्स आणि होरायझन इंडस्ट्रियल पार्क्स यांच्यात आज महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे उद्योग सचिव डॉ.पी.अन्बळगन आणि होरायझन इंडस्ट्रियल पार्क्सचे अध्यक्ष आर.के.नारायणन यांच्यात हा करार स्वाक्षरीत झाला. यावेळी उपमुख्यंत्री एकनाथ शिंदे, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासू, उपसचिव लक्ष्मीकांत ढोके, ब्लॅकस्टोन डहायझर्स प्रा. लि.चे वरिष्ठ व्यवस्थापकीय संचालक तुहिन पारिख, ब्लॅकस्टोन डव्हायझर्स प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक आलोक जैन, एक्सएसआयओ लॉजिस्टिक्स पार्क्सचे व्यवस्थापकीय संचालक आशीष अग्रवाल आदी उपस्थित होते.हा सामंजस्य करार राज्यातील प्रमुख औद्योगिक आणि मल्टिमोडल लॉजिस्टिक क्षेत्रांमध्ये आधुनिक लॉजिस्टिक्स आणि इंडस्ट्रियल पार्क्सच्या विकासासाठी होणार आहे.

या सामंजस्य करारानुसार महाराष्ट्रात १० हून अधिक आधुनिक औद्योगिक व लॉजिस्टिक्स पार्क्स उभारले जाणार आहेत. यासाठी ७९४.२ एकर जमिनीचे क्षेत्रफळ आहे. यापैकी १.८५ कोटी चौ. फूट जमिनीवर बांधकाम करण्यात येईल. या सर्व प्रकल्पांमध्ये मिळून एकूण थेट परकीय गुंतवणूक ही ५,१२७ कोटी आहे. या करारामुळे थेट व अप्रत्यक्ष अशी एकूण २७,५१० रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहे. हे लॉजिस्टिक्स पार्क्स नागपूर, भिवंडी, चाकण, सिन्नर, पनवेल यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी विकसित केले जाणार आहेत. हे प्रकल्प पर्यावरणस्नेही, डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चरयुक्त व रोजगारनिर्मितीस प्रोत्साहन देणारे असून, महाराष्ट्र लॉजिस्टिक्स धोरण २०२४ शी सुसंगत असेल.

ही परिवर्तनात्मक भागीदारी नागपूर, मुंबई, पुणे आणि इतर ठिकाणी जागतिक दर्जाचे, पर्यावरण, सामाजिक आणि शासकीय अनुकूल असे औद्योगिक व लॉजिस्टिक्स हब्स तयार करण्याच्या दिशेने पाऊल टाकणारी असून भारतातील उत्पादन, वेअरहाउसिंग व पुरवठा साखळी उत्कृष्टतेसाठी एक सशक्त पायाभूत रचना निर्माण करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.



# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात छत्रपती संभाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी @ लातुर



श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात जयंती उत्सव समिती आणि कार्यालयाच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सर्वप्रथम प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्रपणे अभिवादन केले. यावेळी उपप्राचार्य प्रा. वनिता पाटील आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती.

यावेळी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराज यांनी संपूर्ण आयुष्यभर आपल्या प्रजेच्या समृद्धीसाठी सातत्याने प्रयत्न केले. आपण आज त्यांच्या जयंती दिनी प्रशासनाने सोपविलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडून आपले कर्तव्य पूर्ण करावे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये आपल्या महाविद्यालयामध्ये संपूर्ण प्रवेश पूर्ण होण्यासाठी आपण सातत्याने विद्यार्थी आणि पालकांच्या संपर्कात राहावे आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या विचारांची प्रत्यक्ष कृती आपल्या दैनंदिन व्यवहारात करावी असे ते म्हणाले. यावेळी रत्नेश्वर स्वामी, राम पाटील, श्रीशैल्य पाटील, ओमकार बोलशेट्टे, विनायक लोमटे, विनोद दाभाडे, संभाजी लातूरे, नरेश वाडकर, अनिल उस्तुर्गे, नंदू काजापुरे आणि संतोष येंचेवाड यांचीही उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव बेंदरगे यांनी केले तर आभार रत्नेश्वर स्वामी यांनी मानले.

# भागुजीराव ढेकळे विद्यालयाने शालांत परीक्षेत यशाची परंपरा राखली







## शाळेचा शेकडा निकाल ९८.१९%

प्रतिनिधी @ गेवराई

तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९८.१९% निकाल लागला असून या शाळेने उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेला शाळेतून १६३ पैकी ११६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यात ३६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर ११ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण होवून शेकडा निकाल ९८.१९% एवढा लागला असून यात गुणानुक्रमे प्रथम कु.राऊत स्नेहा कृष्णा ९५.४०%, द्वितीय कु.बजगुडे दिव्या हनुमान ९५.००% तर तृतीय चि.खाडप आदित्य विनायक ९४.४०% गुण घेऊन उत्तीर्ण झाला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक एम. ए. राऊत, कार्यालयीन अधिक्षक प्रकाश राठोड, प्राचार्य थिटे ए. एस., पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# आमदारांनी स्टंट करु नये, नाळवंडीप्रमाणे न.राजुरीतील बोगसगिरीची चौकशी करणार का ?

## नाळवंडीचे सरपंच ड.राजेंद्र राऊत यांचा सवाल; आमदारांच्या कामांचे 'पोस्टमार्टम' करू

प्रतिनिधी @ बीड



बीड मतदारसंघात नरेगा अंतर्गत झालेल्या कामांची आमदार संदीप क्षीरसागर यांनी पाहणी केल्यानंतर नाळवंडीचे सरपंच ड.राजेंद्र राऊत यांनी आपणही आमदारांच्या कामांचे 'पोस्टमार्टम' करू शकतो, असा इशारा दिला आहे. नाळवंडीमध्ये अचानक पाहणी करून स्टंटबाजी केली जाते, पण नवगण राजुरीसारख्या गावांमध्ये झालेल्या मोठ्या गैरव्यवहारांचीही चौकशी आमदार करणार आहेत का? असा थेट सवाल करत ड.राऊत यांनी आमदारांनी स्टंटबाजी थांबवावी, असे म्हटले आहे.

नाळवंडी ग्रामपंचायतीने नरेगा अंतर्गत नियमांचे पालन करत कामे केली असून, संबंधित कामांची यापूर्वीच चौकशी झाली आहे, समितीचे अहवाल पाहूनच बिले अदा केली आहेत, आताही रस्ते लोकांच्या वापरात आहेत, कोणत्याही ग्रामस्थाची तक्रार नाही, असे ड.राऊत यांनी स्पष्ट केले. सदरील कामांवर आमदारांनी जाऊन केवळ फोटोसेशन केले. ते सध्या काही निवडक गावांमध्येच लक्ष केंद्रित करत असून, त्यांनी शिफारस केलेल्या कामांची चौकशी होईल का? त्यांच्या स्वतःच्या गावामध्ये झालेल्या बोगसगिरीची चौकशी लावतील का? असे सवाल ड.राऊत यांनी उपस्थित केले आहेत. जर आमदारांना खरंच भ्रष्टाचारविरोधी लढा द्यायचा असेल, तर मग नवगण राजुरीसारख्या स्वतःच्या आणि निकटवर्तीय पदाधिकाऱ्यांच्या गावांमध्ये झालेल्या बोगस कामांचीही पाहणी करून वस्तुस्थिती मांडावी. निवडणुकीच्या तोंडावर निवडक गावांमध्ये जाऊन स्टंट करून जनतेची दिशाभूल करणे थांबवावे. शासनाच्या निधीचा अपव्यय कोठे झाला असेल, तर संबंधितांवर कारवाई व्हावी, याला आमचाही पाठिंबा आहे. पण कारवाई ही निवडक नसून सर्वसमावेशक असली पाहिजे, अशी भूमिका सरपंच ड.राजेंद्र राऊत यांनी मांडली. न्याय हवा असेल, तर तो सर्व गावांना सारखाच मिळाला पाहिजे, असा ठाम इशारा ड.राजेंद्र राऊत यांनी दिला आहे.

बीडचे आमदार बीड ते नाळवंडी रस्त्याचा प्रश्न कधी सोडविणार?

बीड तालुक्यातील बीड ते नाळवंडी हा रस्त्याचा प्रश्न ज्वलंत आहे. आमदारकीच्या संपूर्ण कार्यकाळात आमदारांनी या रस्त्याविषयी तोंडातून ब्र शब्द काढला नाही. परंतु लोकांच्या उपयोगात येत असलेल्या गावांतर्गत रस्त्यांची चौकशी लावण्याचा खटाटोप त्यांनी सुरू केला. आहे.

### हिंमत असेल तर नाळवंडीतील जलजीवनच्या कामाची चौकशी करा!

नाळवंडीतील जल जीवन मिशन योजनेअंतर्गत होत असलेले काम दोन वर्षांपासून संथगतीने सुरू आहे. त्याचा गावातील पाणीपुरवठ्यावर परिणाम होत असून ग्रामस्थांना सध्याही पाण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. या कामात आमदारांचे समर्थक सहभागी असल्याने चौकशी लावली जात नाही. हिंमत असेल तर या कामाची चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, असा इशारा ड.राजेंद्र राऊत यांनी दिला आहे.

# भाजप तख़्त साठी बीडला दोन नेत्यात मोठा घमासान ?

प्रतिनिधी @ बीड

भाजपने बीड जिल्ह्यातील अध्यक्षीय पदाला बगल देत ईतर जिल्हाध्यक्ष पदे नवीन कायम केली असून या जिल्ह्याला मात्र वार्यावरती सोडलेने अनेक इच्छुकांच्या भुवया पार उंचावल्या आहेत..? बीडचा भाजप जिल्हाध्यक्ष म्हणून आष्टी येथील एका मास्तरांना नियुक्त केल्याने पक्षात मोठी चल बीचल झाली होती, आष्टीचे स्थानिक आमदार यांच्या विरोधातील गट असणारेला ( देशमुख यांना ) परस्पर निवड करत नियुक्त केल्याने हा सर्व घोळ करून स्थानिक आमदारांना शह देण्यासाठीच हा सारा लवाजमा लावला गेला होता, म्हणून आज बीडची निवड तात्पुरती बाजूला ठेवत ईतर नियोजन झालेने दोन्ही गटातील अनेक ईछूकांना हिरमोड सहन करावा लागला आहे ..

दरम्यान बीडचे पालकमंत्री हे राष्ट्रवादी गटाचे पण भाजप समर्थक आहे .? त्यामुळे सहाजिकच तेंचा संबंध फारच तोडका असा मानला जातोय..खरी मेख ही जिल्ह्या अंतर्गतची आहे..? त्यामुळे धस मूंडे गटात या अध्यक्षीय तख़्त सिंहासन साठी.कमालिची रस्सी खेच सूरु झाली आहे म्हणून.. ' पकडे तो काटता ! अन् छोडे तो भागता .. अशी दयनीय अवस्था आज या पक्षात झाली असलेचे सांगितले जात आहे..

टेरर हत्याचा फटका

दरम्यान जिल्ह्यातील अती झालेल्या गुड़गीरीचा फटका मस्साजोगचे भाजपचे सरपंच संतोष देशमुख याची निरढावलेपणाने केलेली टेरर हत्या ही यास किणार ठरवली जात आहे.! येत्या काळात आष्टी आणि परळीतील नेतृत्वाखाली अध्यक्ष देणे हे डोके दूखी ठरणार आहे , म्हणून कि काय म्हणून धोंडे समर्थक देशमुख यांचे अध्यक्षपद कायम ठेवणार असलेचेही संकेत आहे..,

( तख़्त = सिंहासन )

# ढेकनमोह , चौसाळा आणि बीड शहरात शिवसंग्रम सदस्य नोंदणीस उत्स्फूर्त प्रतिसाद


## सदस्य नोंदणीच्या दुसऱ्या टप्प्यात ग्रामीण भागात शिवसंग्रामचे सदस्य नोंदणी अभियान

बीड (प्रतिनिधी) पुणे येथे पार पडलेल्या शिवसंग्रामच्या राज्यस्तरीय बैठकीमध्ये अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी राज्यस्तरीय सदस्य नोंदणी अभियानाची घोषणा केली होती. त्यानुसार राज्यामध्ये १ मे ३० मे या कालावधीत हे अभियान राबवण्यात येणार आहे. काल दि. १३ मे रोजी नाळवंडी सर्कलच्या वतीने ढेकनमोह येथे तर आज छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त चौसाळा सर्कल शिवसंग्रामच्या वतीने चौसाळा येथे सदस्य नोंदणी अभियानास सुरुवात करण्यात आली. यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांनी स्थापन केलेली शिवसंग्राम तळागळा पर्यंत पोहचवण्यासाठी शिवसंग्राम सदस्य नोंदणी कार्यक्रम आपण हाती घेत आहोत अशी घोषणा शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी केली होती. या सदस्य नोंदणीची सुरवात दि. २ मे रोजी जिल्ह्यात करण्यात आली. आता दुसऱ्या टप्प्यात तालुक्यात आणि सर्कल निहाय सदस्य नोंदणी अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. यात नाळवंडी सर्कलच्या वतीने ढेकनमोह , चौसाळा सर्कल शिवसंग्रामच्या वतीने चौसाळा , बीड शहरातील अल्पसंख्यांक बहुल

भागात आणि भाळवनी या ठिकाणी सदस्य नोंदणी अभियान पार पडले यावेळी या सदस्य नोंदणीस जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून लोकनेते यांचा विचार जिवंत ठेवण्यासाठी आपण शिवसंग्रामचे सदस्य होता असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.यावेळी शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव, सरचिटणीस अनिल घुमरे पाटील,उपाध्यक्ष रामदास नाईकवाडे, सचिन कोटुळे, तालुकाध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पंडितराव माने,युवक जिल्हाध्यक्ष सुनील कुटे,गणेश धोंडरे सचिन जाधव, चौसाळा सर्कल प्रमुख विशाल हावळे, गौतम जोगदंड, राजु येडे, शिवसंग्रामचे तालुकाउपाध्यक्ष दिनकर शेळके,तालुका सचिव सिताराम घुमरे,नाळवंडी सर्कल प्रमुख नागुराव बोरगे, डेकनमोह गण प्रमुख विलास चव्हाण,पाली गण प्रमुख चंद्रकांत देवकर,विजय सुपेकर, बळीभाऊ थापडे,उल्हास घोरड,वैभव डावकर आदीसह कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाटोदा हायस्कूल पाटोदा बेलखंडी तालुका जिल्हा बीड या शाळेची यशाची परंपरा कायम




प्रतिनिधी @ बीड

तालुक्यातील आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित पाटोदा हायस्कूल पाटोदा बे. ता. जि. बीड या शाळेने सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातही यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या वर्षात शाळेचा एस एस सी बोर्ड परीक्षेचा निकाल ९८.८२ टक्के लागला आहे. शाळेतील यशस्वी विद्यार्थी येळवे ऋतुजा सुभाष ९३. ८० टक्के गुण घेऊन प्रथम, कु. माने रूपाली लक्ष्मण ९३% गुण घेऊन द्वितीय व कु. माने ऋतुजा भागवत ९२ . ६०% गुण घेऊन तृतीय क्रमांक मिळवलेला आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर साहेब यांनी केले आहे व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री राजूजी मचाले साहेब व सहाय्यक प्रशासक अधिकारी श्री योगेशजी पवार साहेब श्री एम ए राऊत सर कार्यालयीन अधिकारी व श्री प्रकाशजी राठोड कार्यालयीन अधीक्षक आणि शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री धनवंतजी मस्के साहेब व शाळेचे शिक्षक वृंद व शिक्षकेतर यांनी या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन व शुभेच्छा दिल्या तसेच पाटोदा व बेलखंडी तसेच सर्व परिसरातील ग्रामस्थ व परिसरातील पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे खूप खूप अभिनंदन केले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# विद्यार्थ्यांच्या आत्महत्या मागे दडलय काय........?

बीड (प्रतिनिधी)

येथील एका प्रख्यात डॉक्टरच्या ७२० पैकी ७१० गुण मिळवून भोपाळ येथील ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस या नामांकित वैद्यकीय शिक्षण संस्थेत वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या मुलाने स्वतः च्या छातीवर धारदार शस्त्राने वार करून नुकतीच आत्महत्या करून आपले जीवन संपविल्याची अत्यंत धक्कादायक बातमी वाचली.सदर मुलगा अत्यंत बुद्धिमान होता, घरची आर्थिक संपन्नता असल्याने कोणतीही अडचण नव्हती. कोणत्याही गोष्टीची कमी नसताना आत्महत्या का करावी वाटली ? याचे कारण शिक्षण तज्ञांनी,मानस शास्त्रज्ञांनी व मानसोपचार तज्ञांनी शोधणे गरजेचे वाटते.

मी शिक्षण क्षेत्रात गेली ४५ वर्षापेक्षा जास्त काळ प्राध्यापक,प्राचार्य शैक्षणिक सल्लागार म्हणून काम करत आहे त्यामुळे या विषया संबंधी माझे मत या ठिकाणी व्यक्त करण्याचा प्रयत्न करत आहे.दरवर्षी बोर्डाच्या गुणवत्ता यादीत आलेली १८ ते २४ वर्ष वयोगटातील अनेक अत्यंत बुद्धिमान व हुशार मुले आत्महत्या करताना दिसतात.या मागे अनेक कारणे असू शकतात उदाहरणार्थ पालकांच्या अवास्तव व अवाजवी अपेक्षा, विद्यार्थ्यांच्या आवडी निवडी लक्षात न घेता त्याच्या जबरदस्तीने त्याच्या इच्छेविरुद्ध त्याला न आवडणाऱ्या अभ्यासक्रमास प्रवेश देणे,आपल्या इच्छा व अपेक्षा त्याच्यावर जबरदस्तीने लादणे, अभ्यासाचा ताण, मानसिक ताणतणाव, कौटुंबिक ताणतणाव, आर्थिक अडचणी,प्रेम प्रकरणे,रॅगिंग,भांडणे, अपयश,अपमान, एखादी गोष्ट मनाच्या विरुद्ध होणे इत्यादी बाबींचा समावेश करता येईल.

पूर्वी शालेय अभ्यासक्रमात मूल्य शिक्षणाचा भाग म्हणून रामायण,महाभारत, इसापनीतीच्या कथा, अकबर बिरबलाच्या कथा इत्यादीच्या माध्यमातूनविद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमते बरोबरच वैचारिक क्षमता व मानसिक क्षमता व अध्यात्मिक शक्ती विकसित करून ती अधिक बळकट करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात असे. त्यामुळे कितीही संकट आले,कितीहीअडचणी, अपयश आले तरी अशा संकटाला,अडचणीला किंवा अपयशाला न घाबरता,न डगमगता विद्यार्थी सामोरे जात असत व त्यातूनआपला मार्ग स्वतःच काढत असत.परंतु प्रचलित शिक्षण पद्धतीत अभ्यासक्रमातून हा भाग काढून टाकल्या मुळे केवळ स्मरणशक्ती व बौद्धिक क्षमता विकसित होते जी फक्त त्याला मिळालेल्या गुणांच्या टक्केवारीच्या आधारे मोजली जाते. गुणांच्या टक्केवारी बरोबरच त्याचा शारीरिक,बौद्धिक, मानसिक विकास झाला की नाही ? हे तपासण्याचे कोणतेही साधन प्रचलित परीक्षा व मूल्यमापन पद्धती मध्ये दिसत नाही.

बोर्डाचा परीक्षेचा निकाल लागल्यानंतर अनेक घरांमध्ये असे चित्र दिसते की मुलाला ९७%,९८% मार्क्स मिळाले आहेत परंतु एक टक्का किंवा अर्धा टक्का कमी का पडला यामुळे घरामध्ये रडारडा व स्मशान शांतता आहे, तर काही घरांमध्ये आपला मुलगा पास होणार की नाही या चिंतेत असलेले पालक त्यांच्या मुलाने ३५टक्के ४० टक्के गुण घेऊन पास झाला याचा आनंद ते पेढे वाटून व्यक्त करताना दिसतात.''बरं झालं पास झाला, आम्हाला वाटलं वर्ष वाया जाते की काय ?'' ही भावना त्यांच्या मध्ये दिसून येते. आयआयटी,वैद्यकीय महाविद्यालय किंवा अभियांत्रिकी महा विद्यालयात प्रवेश मिळाला नाही की सर्व संपले अशी भावना आज विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या मनात दृढ झाली आहे. यापेक्षाही अधिक संधी उद्योगधंदे,व्यवसाय, एमपीएससी,यूपीएससी च्या माध्यमातून मिळणाऱ्या सिव्हिल सर्विसेस,कृषी तसेच आर्मी,नेव्ही,एअरफोर्स यासारख्या मिलिटरी सर्विसेस,संशोधन, इंडस्ट्री,व्यवस्थापन, ऑडिट अँडअकाउंटिंग, बँकिंग,रेल्वे इत्यादी क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात सेवेच्या चांगल्या प्रकारच्या संधी उपलब्ध आहेत हेजवळ जवळ आपण विसरलोच आहोत. त्यामुळे प्रशासकीय सेवेत आज उत्तर प्रदेश, बिहार,दिल्ली,हरियाणा इत्यादी राज्यातून फार मोठ्या प्रमाणात तरुण मुले भरती होताना दिसतात.आपण मात्र एखादा सरपंच,पंचायत समितीसभापती,जिल्हा परिषदअध्यक्ष,आमदार खासदार किंवामंत्र्याच्या ओळखीने एखाद्या साखर कारखाना,सूत गिरणी,पंचायत समिती, नगरपालिका किंवा ग्रामपंचायत मध्ये कसली तरी नोकरी मिळते का यासाठी प्रयत्न करत असतो. बदलत्या काळाच्या गरजा ओळखून तरुणांनी नवनवीन वाटा शोधणे गरजेचे आहे. त्या शिवाय आपली प्रगती होणार नाही.

न्यूक्लिअर कुटुंब पद्धतीमुळे घरामध्ये मोजकीच माणसे असतात,आजीआजोबा,काका काकी,बहिण- भाऊ,आत्या- मावशी घरात दिसत नाहीत, त्यामुळे बालवयात मुला वर योग्य ते संस्कार होत नाहीत,अनेक जोडप्यांना एक किंवा दोनच मुले असतात. त्यामुळे अवास्तव लाड केले जातात,जे मागेल ते त्याला दिले जाते, त्याचे सर्व हट्ट पुरवले जातात,त्याला कोणतीही अडचण येऊ देत नाहीत,त्यामुळेअशी मुले हट्टीबनतात,प्रत्येक गोष्ट आपल्या मना प्रमाणे करण्याचाप्रयत्न करतात.त्यामुळे एखादी जरी गोष्ट त्यांच्या मना सारखी झाली नाही की हे मुले आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतात.घरामध्ये सुसंवाद राहिलापाहिजे, मुलाशी सातत्याने बोलले पाहिजे,त्याची मानसिक अवस्था समजून घेतली पाहिजे, त्याच्यामध्ये काही बदल झाल्यास तो का झाला याचा शोध मानसशास्त्रज्ञ अथवा मानसोपचार तज्ञ यांच्या मदतीने वेळोवेळी घेतला पाहिजे,तरच ही मुले जीवनामध्ये यशस्वी होतील.आज गुणवत्ते ऐवजी गुणाधिष्ठित शिक्षण झाल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्याचा शिक्षण तज्ञांनी विचार करणे गरजेचे आहे व त्यानुसार अभ्यासक्रमात आवश्यक ते बदल करणे गरजेचे वाटते. धन्यवाद.

# छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त अंजनवती येथे अभिवादन कार्यक्रम



पाटोदा(प्रतिनिधी)

अंजनवती, ता. १४ मे २०२५: छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज अंजनवती (ता.जि.बीड) येथे अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात गावकऱ्यांसह मान्यवरांनी छत्रपती संभाजी महाराजांना आदरांजली वाहिली. या प्रसंगी नितीन सोनवणे महाराष्ट्र प्रवक्ता तथा जिल्हाध्यक्ष, ऑल इंडिया पँथर सेना बीड.बाळासाहेब मोरे पाटील (प्रदेशाध्यक्ष, शिवशक्ती-भिमशक्ती विचार मंच), अशोक येडे पाटील (जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी, बीड), कैलास येडे पाटील (सरपंच, अंजनवती) यांच्यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य आणि त्यागाचे स्मरण करून त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.कार्यक्रमात गावकऱ्यांनीही उत्साहाने सहभाग घेतला आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्याला उजाळा दिला. हा कार्यक्रम गावातील एकता आणि इतिहासाप्रती आदराचे प्रतीक ठरला.

# वाढदिवसाच्या निमित्ताने ५ लाख ३७ रूपये जमा झाले, पंतप्रधान सहाय्यता निधीला अक्षय मुंदडा रक्कम जमा करणार

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

राजकीय क्षेत्रात काम करणारा तरूण संवेदनशील भुमिकेत वागत असेल तर खर्या अर्थाने समाज आदर्शाचे अनुकरण निश्चित करतात. भाजपाचे युवा नेते अक्षय मुंदडांनी स्वत:चा वाढदिवस साधेपणाने साजरा करताना विविध सामाजिक उपक्रम हाती घेतले. शिवाय शुभेच्छा देणार्या हितचिंतकांनी पंतप्रधान सहाय्यता निधीला योगदान देण्याचे आवाहन केल्यानंतर दिवसभरात सुमारे ५ लाख ३७ हजार रूपयाचा निधी जमा झाला तर ७५ तरूणांनी रक्तदान केले.



भारत-पाकिस्तान युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभुमीवर मुंदडांनी वाढदिवस रद्द करून सामाजिक उपक्रम हाती घेण्याचे आवाहन केले होते. शुभेच्छा देण्यासाठी येणार्या कार्यकर्ते, मित्र परिवारांनी हार-तुरे न आणता पंतप्रधान सहाय्यता निधीला अर्थसहाय्य योगदान देण्याची विनंती केली होती. त्यानुसार अक्षय बंगल्यावर दिवसभर शुभेच्छा देणार्याची गर्दी होती. मित्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबीर आयोजित केले. त्यात ७५ तरूणांनी रक्तदान केले. पंतप्रधान सहाय्यता निधीमध्ये शुभेच्छा देण्यासाठी येणार्या सर्वांनीच योगदानाच्या माध्यमातुन सहभाग घेतला. दिवसभरानंतर सायंकाळच्या सुमारास एकुण रक्कम जमा सुमारे ५ लाख ३७ हजार झाल्याची माहिती भाजपाचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी दिली. तसं पहाता राजकारणात वाढदिवस थाटामाटाने साजरा करण्याची फॅशन आली असताना असा एखादा तरूण नेता सामाजिक संवेदना ज्यातुन राष्ट्रभक्तीचे आदर्श निर्माण करतो, खर्या अर्थाने कौतुकास्पद म्हणावे लागेल. वाढदिवसाच्या निमित्ताने दिवसभर बंगल्यावर अक्षय मुंदडा बसुन होते. मात्र साध्या पुष्पगुच्छाचा देखील स्विकार केला नाही. वास्तविक पहाता भारताने पहेलगाममध्ये झालेल्या हल्ल्याचा ऑपरेशन सिंदुर द्वारे जबरदस्त बदला घेतला. पण युद्धजन्य परिस्थितीमुळे वाढदिवस त्यांनी साजरा केला नाही. विविध सामाजिक उपक्रम कार्यकर्त्यांनी घेतले ज्यामध्ये वृक्षारोपण, आत्महत्याग्रस्त शेतकर्यांना बियाणाचे वाटप, मधुमेह तपासणी तथा इतर कार्यक्रम. सामाजिक कार्याचे आदर्श नेतृत्वाकडून जेव्हा प्रस्थापित होतात त्यावेळी संवेदनशीलता वाढते. याच आदर्शाची पेरणी केज मतदारसंघात मुंदडा कुटुंबियांनी १९८० ते ९०च्या दशकापासून केली तोच वारसा सुपुत्राच्या माध्यमातुन पुढे सुरू झालेला दिसतो. सामान्य जनतेच्या सुखदु:खात सहभागी व्हायचं आणि गोरगरिबांची सेवा करायची हा मुळ पिंड कुटुंबियांचा आहे. वर्तमानकाळात लग्नसराईचे दिवस असल्याने आ.सौ.नमिताताई मुंदडा, जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा आणि अक्षय संपुर्ण मतदारसंघात लग्नाचे निमंत्रण तिथे यांचे पाऊल मोसमात नाही म्हटले तरी १५१ पेक्षा अधिक लग्न कुटुंबियांनी लावल्याचे कळते.



# भारतीय सैनिकांचा अवमान करणाऱ्या भाजपा मंत्र्यांच्या प्रतिमेला मारले जोडे

भाजपा मंत्री विजय शहावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा-काँग्रेस

ज्या अतिरेक्यांनी आपल्या निष्पाप नागरिकांना गोळीबार करत मारले.

त्याचा बदला म्हणून भारतीय सैनिकांनी ऑपरेशन सिंधूर राबवत कर्नल सोफिया कुरैशी व पायलट व्योमिका सिंह यांनी पाकिस्तानातील दहशतवाद्यादी तळावर हवाई हल्ले करून.दहशतवाद्यांचे समुळ नष्ट केले.अशा जाबाज सैनिकांच्या पराक्रम, शौर्याचे संपूर्ण देश कौतुक करत असताना मध्ये प्रदेश सरकार मधील भाजपा मंत्री विजय शहा यांनी आम्ही अतिरेक्यांना मारायला त्यांचीच बहिण पाठवली म्हणत बेताल, बेजबाबदार, संतापजनक वक्तव्य करून आपल्या सैनिकांचा अवमान करीत त्याचं खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे.अशा भाजपा मंत्र्यांच्या प्रतिमेला काँग्रेस सह समविचारी पक्षाच्या वतीने माजलगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी जोडे मारून मंत्री विजय शहाला तात्काळ मंत्री मंडळातून हाकलून त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा असे काँग्रेस तालुकाध्यक्ष नारायण होके पाटील काम्रेड बाबा मुस्दीक शेख रशीद राजेश घोडे नामदेव सोजे हरिभाऊ सोळंके धम्मानंद साळवे दत्ता कांबळे फारूक शेख मनोज परके शरद यादव यांच्या सह कार्यकर्त्यांनी केली.

# शंभर टक्के गुण घेणारे पाचही विद्यार्थी सातत्य कोचिंग क्लासेस चे

## सातत्यने यशाची परंपरा कायम राखली तुकाराम येवले

माजलगाव (प्रतिनिधी)

विद्यार्थी घडवणारे फॅक्टरी म्हणून ओळख असणाऱ्या येथील सातत्य कोचिंग क्लासेस चे शंभर टक्के गुण मिळवणारे पाच विद्यार्थी असून ९०% पेक्षा अधिक गुण मिळवणारे ९१ विद्यार्थी आहेत गुणवंत यशवंत विद्यार्थी सातत्याच्या माध्यमातून घडवले जातात याचा अभिमान असल्याचे मत शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले यांनी व्यक्त केले.

मागील पंचवीस वर्षापासून शहरांमध्ये बी एन कुलकर्णी यांनी सातत्य कोचिंग क्लासेस ची सुरुवात केली. नुकताच दहावीचा निकाल जाहीर झाला असून सातत्य कोचिंग क्लासेस च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे यावर्षी शंभर टक्के गुण मिळवणारे पाच विद्यार्थी असून ९०% पेक्षा अधिक गुण मिळवणारे ९१ विद्यार्थी आहेत. सातत्य कोचिंग क्लासेस ची टीम विद्यार्थ्यांना घडवण्याचे काम करत असल्याचे मत शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले यांनी व्यक्त केले व या क्लासेसचे सर्वे सर्व असणारे बी एन कुलकर्णी यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या यावेळी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष उमेश मोगरेकर, एकनाथ मस्के, दिनकर शिंदे, खरेदी विक्री संघाचे उपाध्यक्ष भालचंद्र पाठक, पत्रकार कमलेश जाब्रस राजेंद्र भीलेगावकर, प्रशांत पत्की, संजय रत्नपारखी मनोज देशमुख अशोक काळे, शैलेश देशमुख यांची उपस्थिती होती.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात छत्रपती संभाजी महाराज जयंतीसह विविध सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

केज/प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड येथे दिनांक १४ मे २०२५ रोजी स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली सर्वप्रथम स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजयांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून पुजन व वंदन करण्यात आले. शिवदास गायकवाड, रामराजे गायकवाड, उत्तरेश्वर गायकवाड,. रामकृष्ण तात्या गायकवाड,माजीसैनिक विठ्ठल सौदागर,सुभाष गायकवाड,सिताराम वैरागे,विष्णू टोणगे, रविंद्र गायकवाड,लक्ष्मी पुंड,श्रुती पुंड,ज्ञानेश्वरी पुंड,कृष्णा गिरी,अरुण गायकवाड,बाळासाहेब गायकवाड



यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.अध्यक्ष स्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक,ख्यातनाम वक्ते, व्याख्याते,प्राचार्य डॉ. वसुदेवबप्पा गायकवाड हे होते.यावेळी आनंद भैय्या गायकवाड, ज्ञानेश्वरी पुंड,लक्ष्मी पुंड श्रुती पुंड यांची थोडक्यात व्याख्याने झाली.मान्यवरांच्या उपस्थितीत परिसंवाद व चर्चासत्र घेण्यात आले.अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. वसुदेवबप्पा गायकवाड यांनी केला.दि.१३ मे रोजी नारदमुनी जयंती साजरी करण्यातआली. दि.१२ मे रोजी बुद्ध जयंती साजरी करण्यात आली.दि.११ मे रोजी नृसिंह जयंती साजरी करण्यात आली.दि.९ मे रोजी महाराणा प्रताप जयंती व कर्मवीर भाऊराव पाटील पुण्यतिथी साजरी करण्यात आली.दि.८ मे रोजी रविंद्रनाथ टागोर जयंती व जागतिक रेडक्रॉस दिन साजरा करण्यात आला.दि.६ मे २०२५ रोजी छत्रपती राजर्षी शाहु महाराज पुण्यतिथी साजरी करण्यात आली.या विविध कार्यक्रमात संजय सोनवणे,बन्सी नाना गायकवाड, नारायण भाऊ गायकवाड ,दादासाहेब गायकवाड,रामराव तात्या गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, जालिंदर मधुकर,यांच्या सह वाचक,हितचिंतक यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन,आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

# जन्म मृत्यू वा कुठलीही भौगोलिक गोष्ट ही भगवंतांचीच देणं असते - ह.भ.प.अदिनाथ महाराज दानवे

आष्टी (प्रतिनिधी)

जन्म मृत्यू वा कुठलीही भौगोलिक गोष्ट ही भगवंताचीच देणं असते पण नेमके हेच न समजल्यामुळे सगळीकडे अशांती, असमाधानी वृत्ती व त्यामुळे मानवतेचा होत असलेला ऱ्हास पाहायला मिळत आहे. देवपूजेचे अवडंबर करण्यापेक्षा मानवपूजा केल्याने मोठे पुण्य लाभते,'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपले, तोचि साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा' हे आचरण ज्याच्या जवळ असेल तोच खरा भाग्यवंत होय. जन्म मृत्यू वा कुठलीही भौगोलिक गोष्ट ही भगवंतांचीच देणं असते असे प्रतिपादन ह. भ. प. अदिनाथ महाराज दानवे यांनी केले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथे शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी आयोजित केलेल्या पंचदिनी किर्तन सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशी सोमवार दि. १२ मे रोजी किर्तन सेवेत ह. भ. प. आदिनाथ महाराज दानवे बोलत होते.

ह. भ. प.आदिनाथ महाराज दानवे म्हणाले की, जीवन जसे वाट्याला येईल



तसे जगावे. जे उपलब्ध होईल ते अंगीकारावे आनंदी जीवन जगा. तुमच्या वाट्याला सुख दुःख, वेदना आल्या तर त्या हसत मुखाने सहन करा, प्रेम आले तर प्रेम वाटा, वाट्याला आलेले मनापासून स्वीकारा. द्विधा मनःस्थितीत, रडतपडत, कण्हत जगू नका. आपल्या मनस्थितीवर आपले जीवन अवलंबुन असते. सुख आपण आनंदाने स्वीकारतो पण दुःख स्वीकारत नाही. दुःख ज्या दिवशी खुल्या मनाने स्वीकाराल त्या दिवसापासून जन्म मृत्यू या दोन्ही घटनांकडे समान नजरेने बघायला शिकाल. इतके वय झाले तरी मनाची पाटी कोरी आहे. त्याने जीवन जाणले आणि तो मृत्यूही जाणून घेईल. ज्याला जीवन आणि मृत्यू दोन्ही कळाले. त्याला परमत्म्या ओळखला आहे असे समजा. परमात्मा जीवनात आहे तसा मृत्यूमध्येही आहे. जीवन म्हणजे परमात्म्याचा दिवस तर मृत्यू म्हणजे त्याची रात्र. ज्याने केवळ दिवसच जाणला पण रात्रीबद्दल काहीच जाणू शकला नाही, त्याचे ज्ञान अपूर्णच म्हणायला हवे. असच जीवनभराच्या कष्टाने थकला भागलेला माणूस मृत्यूच्या शांत झोपेची इच्छा धरतो. जो नीटपणे जगला, तोच नीटपणे मृत्यूचा स्वीकार करू शकतो. सम्यक जीवनातून सम्यक मृत्यूची प्राप्ती होते. मृत्यूचे अजिबात भय बाळगू नका. घाबराल तर जीवन हातून निसटून जाईल आणि मृत्यूही निसटेल. त्या अवस्थेत तुमचे जगणे न जगण्यासारखे असेल आणि मरणही तसेच असेल. सगळीकडून रिकामेच राहाल. दुःखही सहन होत नाही आणि सुखही सहन होत नाही अशी तुमची अवस्था असेल तर तुमच्या डोळ्यावरची झापडं दूर होऊन तुम्हाला तुमच्या अंतरंगात दिसायला लागेल. या अवस्थेचा उपयोग करा. प्रेम आणि पीडा दोन्हीपासून मुक्त होण्यासाठी नामचिंतन आवश्यक असल्याचे ह. भ. प. आदिनाथ महाराज दानवे यांनी सांगितले.

# डॉ. सुरेंद्र कलंत्री परळी व माजलगाव शाखेचे पालक संचालक

माजलगाव (प्रतिनिधी)

पूर्णवादी बँकेचे संचालक असलेले तेलंगाव येथील प्रसिद्ध व्यापारी तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुरेंद्र कलंत्री यांच्यावर बँकेने माजलगाव आणि परळी शाखेचे पालक संचालक म्हणून जबाबदारी टाकली आहे.बीडच्या पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेमध्ये डॉ. सुरेंद्र कलंत्री हे संचालक म्हणून निवडून आलेले आहेत. त्यांच्यावर आता बँकेने अधिकच्या जबाबदाऱ्या टाकल्या आहेत. बँकेच्या वतीने विविध शाखांसाठी पालक संचालक जाहीर करण्यात आले असून यात माजलगाव आणि परळी (रिरश्रळ) शाखेसाठी डॉ. सुरेंद्र कलंत्री यांना पालक संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. त्यासोबतच डॉ. सुरेंद्र कलंत्री यांना बँकेच्या गुंतवणूक उपसमितीच्या अध्यक्षपदी तर लेखापरीक्षण उपसमितीच्या सदस्यपदी निवडण्यात आले आहे. डॉ. सुरेंद्र कलंत्री एक



प्रथितयश व्यावसायिक असून सामाजिक कार्यांमध्ये देखील त्यांचा सक्रिय वावर असतो. त्यांच्या याच अनुभवाचा फायदा त्यांच्या नव्या जबाबदारीच्या माध्यमातून बँकेला (इरपज्ञ) होणे अपेक्षित आहे.

# श्रीक्षेत्र चाकरवाडीच्या शिवपुराण महाकथेत माजलगावकर करणार पाच लक्ष भाविकांना अन्नदान

## माजलगावात माउली भक्तांनी केला बैठकीत संकल्प



माजलगाव (प्रतिनिधी)

विसाव्या शतकातील महानसंत ज्ञानेश्वर माउली यांच्या पुण्यतिथी निमीत्त श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे सप्ताहामध्ये राष्ट्रीय संत शिवभक्त पारायणकार प. पु. प्रदिपजी मिश्रा यांच्या अमृतमय वाणीतुन शिवमहापुराण कथा व ज्ञानयज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या शिवमहापुराण कथेस प्रतिदिन पाच ते सात लाख शिवभक्त जमतील असा अंदाज आहे. या शिवमहापुराण कथेसाठी एक दिवसाच्या पाच ते सात लक्ष भाविकांच्या अन्नदानाचे नियोजन माजलगाव तालुक्यावर सोपविले असुन त्याचा संकल्प येथील माउली भक्तांनी बैठकीत केला आहे.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी विसाव्या शतकातील महासंत विभुती प. पु. माउली महाराज चाकरवाडीकर यांच्या रौप्यमहोत्सवी पुण्यतिथीनिमीत्त भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह श्री ग्रंथराज ज्ञानेश्वर पारायण व श्री शिवमहापुराण कथा ज्ञानयज्ञ सोहळा दि. ८ जुन ते १४ जुन २०२५ दरम्यान होणार आहे. कथा प्रवक्ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील प. पु. प्रदिपजी मिश्रा हे आहेत. या सप्ताहास येणा-या लाखो भाविकांकरीता एक दिवसीय अन्नदान पुरविण्याचा संकल्प माजलगाव तालुक्यातुन करण्यात आला. शहरातील जुना मोंढ्यातील गणेश मंदिरात नुकतेच पार पडलेल्या बैठकीत संकल्प करण्यात आला असुन निधी संकलनास सुरूवात करण्यात आली आहे. एक ते दिड कोटी रूपयांचा निधी या देवकार्यासाठी लागणार असुन भाविकांतुन भरघोस असा निधी दिला जात आहे. त्यामुळे लवकरच हा निधी जमा होणार आहे. बैठकीस सुरेंद्र रेदासणी, डॉ. भारत वाघमोडे, रविंद्र कानडे, डॉ. शंकर जुजगर, गोविंद बजाज, नारायण सातपुते, धनराज बंब, गणेश भंडारी, मथुरादास लाहोटी, पांडुरंग चांडक, गोविंद करवा, गणेश लोहिया, विष्णु करवा, डॉ. अशोक तिडके, अमोल सरवदे, बाळु ताकट, विष्णु मुंदडा, उमेश मोगरेकर, तुकाराम येवले, विनायक रत्नपारखी, दत्ता महाजन, अविनाश कांडुरे यांचेसह शेकडो माउली भक्त उपस्थित होते.



## श्री.संत गोरोबा काका मूर्तीप्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात संपन्न

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे श्री. संत गोरोबा काका व श्री. विठ्ठल रुक्मिणी मुर्तीप्राणप्रतिष्ठा सोहळा महंत ह. भ. प. सुदर्शन महाराज व भागवताचार्य ह. भ. प. काशिनाथ महाराज शास्त्री यांच्या हस्ते संपन्न झाले. मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त ह. भ. प. काशीनाथ महाराज शास्त्री यांचे कीर्तन संपन्न झाले. यावेळी युवा नेते जयदत्त (भैय्या) धस, मा. जि. प. अध्यक्ष विजय गोल्हार, डॉ. अशोक सोनवणे, गोरक्षनाथ गोरे, विनायक राऊत, मा. सभापती शत्रुघ्न मरकड, सरपंच दत्तात्रय खोटे, धामणगाव गटाचे नेते संजय गाढवे, मा. पंचायत समिती सदस्य रावसाहेब लोखंडे, बाबासाहेब झिंजुर्के, मोहन जगताप, संतोष भणगे, सरपंच अशोक गर्जे, श्रीमंत भोसले, संजय भोसले, ज्ञानेश्वर भोसले, शेषराव भोसले, सुरेश खिलारे, लक्ष्मण भोसले, भागवत बोराडे, दादासाहेब खिलारे, बाबासाहेब झरकर, बाबासाहेब भोसले, जगन्नाथ खिलारे, नवनाथ भगत, बबन जगताप, कल्याण राऊत, राम कुलकर्णी, यादव महाराज, शिवाजी खिलारे, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख शिवाजी बोराडे व संत श्री. गोरोबा काका सेवा मंडळाचे सर्व सदस्य, माता भगिनी, सांगवी पाटण येथील ग्रामस्थ व पंचक्रोशीतील सामाजिक राजकीय, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रातील मान्यवर

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत छत्रपती संभाजी राजे भोसले जयंती साजरी

केज/प्रतिनिधी

छत्रपती संभाजी राजे भोसले यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती सुदाम सरवदे व जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम व दादा खामकर यांनी पुष्पहार अर्पण करून पुजन करून अभिवादन केले. छत्रपती संभाजी राजे भोसले यांचा जन्म दि.१४ मे १६५७ रोजी पुरंदर किल्ल्यावर झाला.त्यांच्या आईचे नाव महाराणी सईबाई होते.छत्रपती संभाजी शिवाजी राजे भोसले हे मराठा साम्राज्याचे २ रे छत्रपती होते.ते महाराणी सईबाई व छत्रपती शिवाजी राजे भोसले यांचे थोरले चिरंजीव होते.ते उत्कृष्ट स्वराज्य रक्षक होते. त्यांनी वयाच्या १४ व्या वर्षी बुधभूषण राजनिती हा संस्कृत ग्रंथ लिहिला.ते संस्कृत भाषेचे अति उत्तम अभ्यासक व जाणकार होते.ते स्वराज्यरक्षक होते.ते धर्मरक्षक होते. त्यांनी साधु - संतांना राजाश्रय देऊन अभय दिले.अशी माहिती आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळातरनळी शाळेचे मुख्याध्यापक श्री.राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी दिली.या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष




संपत्ती सुदाम सरवदे,उपाध्यक्षा सौ. सीमा सुधीर मोहिते, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य,राधा आक्का खामकर,अंगद दत्तु माने,आण्णा मोहिते श्रीहरी योगिराज खामकर,दादासाहेब खामकर शाळा व्यवस्थापन समिती माजी अध्यक्ष सुशिल जमाले,आकाश संजय घाडगे,आतिष सतिश जमाले,संतोष विष्णु माने,अनिकेत आबासाहेब गायकवाड, ज्ञानेश्वर सुशिल जमाले, गोविंद बाबासाहेब गायकवाड,अक्षय राजाभाऊ कदम,पी एम पोषण शक्ती निर्माण योजनाचे कामगार श्री. गणेश काशिनाथ माने, विद्यार्थी,विद्यार्थिनी हे उपस्थित होते.सौ.सिमा सुधीर मोहिते यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## महाराणी ताराबाई विद्यालयाची साक्षी खाडेने गणितात १०० गुण घेऊन

### राज्यात अव्वल तर हर्षदा नाईकवाडेला विज्ञानात ९९ गुण प्राप्त

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी येथील महाराणी ताराबाई माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाने आज पर्येत अनेक गुणवंत निर्माण केले एन एम एम एस शिष्यवृत्ती परीक्षा असेल ,शिष्यवृत्ती परीक्षा असेल, राज्यस्तरीय -विभागीय क्रीडा स्पर्धा असेल ,राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शन असेल किंवा २०२५ मध्ये झालेली १०वी बोर्डाची परीक्षा असेल या सर्व शिक्षणा चळवळीमध्ये आपला एक आगळावेगळा ठसा उमटवण्याचा मान महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने पटकावलेला आज तागायत दिसून येतो .

फेब्रुवारी- मार्च २०२५ मध्ये झालेला १० बोर्डाच्या परीक्षेत वडवणी तालुक्यात सर्वप्रथम घेण्याचा मान कु.हर्षदा नाईकवाडे ही ९७.००टक्के गुण प्राप्त करून मिळवला. कु.साक्षी खाडेने ९६.८०टक्के गुण मिळाले हिने दुसरा क्रमांक प्राप्त केला .कु.समृद्धी पाटोळेला ९५.६० % गुण मीळऊन तिसरा तर



कु.निकिता झाडेने ९५.०० टक्के गुण मिळवूनक्षचौथा क्रमांक मिळवला

या १०वी बोर्डाच्या परीक्षेत कुमारी साक्षी खाडेंनी गणितात १०० पैकी १०० गुण मिळवून राज्याच्या गणित विषयाच्या यादीत अव्वल स्थान मिळवून वडवणी तालुक्याच्या वैभवात एक मानाचा तुरा रोवण्याचे कार्य केले .

तर हर्षदा नाईकवाडे विज्ञान विषयात १०० पैकी ९९गुण मीळऊन यश संपादन केले गणित - विज्ञानासारख्या कठीण विषयात १०० व ९९ गुण मिळवणे हे येरा गबाळ्याचे काम नाही ही चिरंतन अभ्यासातील सातत्य आणि विषय शिक्षकांचे अनमोल मार्गदर्शन याचा हा परिणाम असतो अशी प्रतिक्रिया संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक कार्यवाह माजी आमदार केशवराव आंधळे ,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणी शालेय समिती अध्यक्ष संजयभाऊ आंधळे ,रणजित मधुकरराव संचालक ,अशोक केशवराव आंधळे संचालक या विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी डी, उप प्राचार्य अशोक मस्के, पर्यवेक्षक धाईतिडक पी.एम., अर्थ विभाग प्रमुख श्री डोईफोडे आर एस व १०वी बोर्डाचे परीक्षा प्रमुख श्री ठोंबरे एच आर व १२वी बोर्डाचे परीक्षा प्रमुख प्रा. कांबळे आर आर यांनी अशा प्रकारची प्रतिक्रिया व्यक्त केली.

## पठाण माजेदखान फिरोजखान यांचे दहावी परीक्षेत यश

पाटोदा (प्रतिनिधी)

दहावीच्या परीक्षेत पठाण माजेदखान फिरोजखान ८८.६०% गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. कष्ट, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर मिळवलेले हे यश प्रेरणादायी आहे. त्यांच्या यशामुळे कुटुंबीयांसह मित्रपरिवारात आनंदाचे वातावरण आहे.पठाण माजेदखान फिरोजखान यांनी अभ्यासात दाखवलेली चिकाटी आणि मेहनत कौतुकास्पद आहे. शाळेच्या शिक्षक आणि पालकांच्या मार्गदर्शनासह त्यांनी हे यश मिळवले आहे. त्यांच्या यशाने शाळेचे नाव उज्वल केले असून, इतर विद्यार्थ्यांसाठी ते प्रेरणेचे स्रोत ठरले आहेत. युवा नेतृत्व जुनेद भैय्या पठाण परिवारातर्फे पठाण माजेदखान फिरोजखान यांचे हार्दिक अभिनंदन व पुढील



शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा !

## कु.सबा समीर सय्यद दहावी बोर्ड परीक्षेत तृतीय

आष्टी (प्रतिनिधी)

दहावी बोर्ड परीक्षेत मोतीलाल कोठारी विद्यालय कडा या शाळेतील विद्यार्थीनी कु. सबा समीर सय्यद हिने ९७.६० % मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. तिला यासाठी तिच्या शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. सबा सय्यद हिने आज पर्यंत शालेय शिक्षण घेत असताना अनेक राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय निबंध भाषण स्पर्धेत पारितोषिक मिळवले आहे. तिचे आकाशवाणी केंद्र बीड येथे भाषणाचे प्रसारण झालेले आहे. सबाला जिल्हास्तरीय आदर्श गुणवंत विद्यार्थी हा पुरस्कार देखील मिळालेला आहे. तसेच सबा पाचवी आणि आठवी स्कॉलरशिप धारक विद्यार्थिनी आहे. दहावीच्या परीक्षेतील यशासाठी तिने केलेले कष्ट, जिद्द, चिकाटी आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे तिला हे यश मिळाले. तिच्या या यशासाठी मुख्याध्यापक शिकारे सर, प्रा. डॉ. जमीर सर, नईमभैय्या शेख, समीर



सय्यद सर यांनी तिचे अभिनंदन करुन पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## माऊली विद्यापीठ संस्थेच्या विविध शाखेच्या निकालाच्या यशाची परंपरा कायम

केज/प्रतिनिधी

माऊली विद्यापीठ संस्थेच्या विविध शाखे तील दहावीच्या विद्यार्थ्यांनी निकालात यश संपादित केले.भारतरत्न राजीव गांधी माध्यमिक विद्यालय १००%,सरस्वती कन्या प्रशाला १००%,रामराव पाटील माध्यमिक विद्यालय ९८.३३, माध्यमिक विद्यालय उमरी ९७.०५ ,माऊली माध्यमिक विद्यालय ८०.९५ आदी सर्व विद्यालयांचा निकाला उत्कृष्ट लागला.विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम राखली आहे त्या यशाबद्दल संस्थेच्या मार्गदर्शक खा.रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील,सचिव आदित्य पाटील,माऊली विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी प्रताप मोरे, मुख्याध्यापक श्री. गोरे,श्रीमती घुले,श्री. कांबळे,श्री.काळे,श्री. खोसे सर आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# महावितरणच्या कार्यकारी संचालकांचा लेखा कर्मचार्यांनी केला निषेध

परभणी (प्रतिनिधी) : महावितरण कंपनीचे कार्यकारी संचालक (प्रकल्प) औंढेकर यांनी परभणीत आयोजित केलेल्या जनमित्र संवाद या कार्यक्रमात सार्वजनिकरीत्या सर्व लेखा कर्मचारी व अधिकारी यांना अवमानास्पद वागणूक दिल्याबद्दल महावितरण मंडळ कार्यालयांतर्गत सर्व लेखा कर्मचार्यांनी निषेध नोंदविला आहे.

कार्यकारी संचालक औंढेकर यांनी जनमित्र संवाद या कार्यक्रमात सर्व लेखा कर्मचारी व अधिकारी यांना व्यासपीठावर उभे केले व जिल्ह्यात सुमारे ५०० कोटी रुपयांच्या थकबाकीस जबाबदार धरुन व अवमानास्पद आणि बेजबाबदार वक्तव्ये केली. लेखा कर्मचार्यांनी कार्यकारी संचालकांचे ते वक्तव्य व पध्दत तांत्रिक व लेखा संवर्गात दरी निर्माण करणारी व महावितरण कंपनीच्या एकात्मतेवर हल्ला करणारी कृती आहे, अशी टीका केली. महावितरण कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकांना पाठविलेल्या या निवेदनात केवळ कर्मचार्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले नाही तर त्यांच्या आत्मसन्मानावर देखील एका जबाबदार पदाधिकार्याने घाला घातला आहे. शिस्तबध्द व जबाबदारीने वागणे




अपेक्षित असतांना कार्यकारी संचालकांची ही कृती बेजबाबदारपणाचे लक्षण आहे, अशी टीका करीत औंढेकर यांच्या एकंदरीत कार्यपध्दतीवर या लेखा कर्मचार्यांनी टीकेचे झोड उठविले. त्यांच्या विरोधात जोपर्यंत कारवाई होणार नाही, तोपर्यंत सर्व लेखा कर्मचारी असहकार आंदोलन करतील, असा इशाराही परभणी मंडळांतर्गत लेखा कर्मचार्यांनी दिला. सुट्टीच्या दिवशी कंपनीचे केले जाणारे कोणतेही काम यापुढे केले जाणार नाही. तांत्रिक स्वरुपाच्या फिल्ड कामात लेखा कर्मचारी सहभागी होणार नाहीत, सहकार्य करणार नाहीत यासह अन्य बाबीही या कर्मचार्यांनी निवेदनातून नमूद केल्या आहेत. रमेश आचार्य, दत्तराव शेळके, ऋषिकेश गायकवाड, विक्रम ढवळशंक, कौस्तूभ जिंतूरकर, कल्याण राऊत, संतोष थोरे, बालासाहेब पुकाणे, विक्रम चव्हाण, सागर मुंदडा, रुपेश कुलथे, राहुल पांचाळ, बालाप्रसाद इक्कर, मारोती झाडे, रमेश पैठणे, नागोराव पैठणे, राजू मुंढे, कल्पेश जिंतूरकर, एस.बी. घुगे, के.बी. शिंदे, विनोद खंदारे, दिलीप सानप, प्रफुल्ल जोशी यांच्यासह अन्य कर्मचार्यांच्या या निवेदनावर स्वाक्षर्या आहेत.

## परभणीतून १९ वर्षीय तरुणी बेपत्ता

परभणी (प्रतिनिधी): शहरातील लक्ष्मीनगर, पारदेश्वर मंदिर जवळील रहिवासी १९ वर्षीय सावली उर्फ दिव्यानी मुकुंद शिंदे ही तरुणी दि. ११ मे २०२५ पासून बेपत्ता झाली आहे. तिच्या वडिलांनी दि. १२ मे रोजी नानलपेठ, परभणी पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिव्यानी शिंदे हिचे वडील मुकुंद बालासाहेब शिंदे (मो.९९७०८१९८२१) हे शेती व्यवसाय करतात. दि. ११ मे रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास ते शेतीच्या कामासाठी बाहेर गेले होते. त्यावेळी घरात त्यांची पत्नी जयश्री, आई कुसुमबाई, लहान मुलगी समीक्षा आणि दिव्यानी उपस्थित होत्या. दरम्यान, दिव्यानी हि कोणालाही काहीही न सांगता अचानक घराच्या दाराला कडी लावून निघून गेली. काही वेळाने जयश्री शिंदे यांनी मुकुंद शिंदे यांना फोन करून घडलेली घटना कळवली. तात्काळ घरी परतलेल्या मुकुंद शिंदे यांनी परिसरात, नातेवाईकांकडे, तसेच दिव्यानीच्या मित्र-मैत्रिणींमध्ये तिचा शोध घेतला. मात्र ती अद्याप कुठेही सापडलेली नाही. दिव्यानीचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे - व्यवसाय - शिक्षण, उंची अंदाजे ५ फूट, रंग गोरा, मध्यम बांधा, केस बॉब कट व काळ्या रंगाचे, अंगात निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट व पांढऱ्या रंगाचा




चौकडा शर्ट, पायात गुलाबी रंगाचा बूट, डावा डोळा अर्धवट झाकलेला, तिला मराठी, हिंदी भाषा बोलाता येते. दिव्यानी कोणाला आढळल्यास नानलपेठ पोलीस स्टेशन संपर्क क्रमांक ०२४५२-२२०४५०, पोलीस निरीक्षक श्री. कामठेवाड, मो. ८६६८५८३३६६, तपासीक अंमलदार पोलीस हेडकॉन्स्टेबल एस.एस. मुरकुटे, मो. ८७६६८८१६८२ या क्रमांकावर साधावा, असे आवाहन असे तपासीक अंमलदार, पोलीस स्टेशन नानलपेठ, परभणी यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.